# “ पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर – एक अभ्यास ”

एम . फिल . **(M.Phil.)** ग्रंथालय व माहितीशास्त्र

शोध प्रबंध


संशोधक

लिंगे सुनिता लक्ष्मण

मार्गदशक

डॉ . सुनिता बर्वे

सिनीयर टेक्निकल ऑफीसर,
राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा,
पुणे .



सादर

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

गुलटेकडी, पुणे४११०३७.

मे,२०१६

# अभ्यासकाचे प्रमाणपत्र

मी, लिंगे सुनिता लक्ष्मण, कायम नोंदणी क्र.१०४११०००२५१,असे प्रमाणित करते की,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, येथे एम.फील. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र)अभ्यासक्रमासाठी **"पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर – एक अभ्यास "** या संशोधन प्रकल्पातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली असून त्या माहितीचा संदर्भ योग्य त्या ठिकाणी नमूद केला आहे.

हा प्रकल्प मी स्वत: तयार केलेला असून त्यातील सर्व संशोधन माझे स्वत:चे आहे. या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही याची मी खात्री करून घेतली आहे.तसेच मी हा संशोधन प्रकल्प इतर कोणत्याही विद्यापीठात सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे संशोधक सही

दिनांक :

लिंगे सुनिता लक्ष्मण

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लिंगे सुनिता लक्ष्मण, कायम नोंदणी क्र.१०४११000२५१ यांनी

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. येथे एम.फील.(ग्रंथालय आणि माहितीशास्त्र)अभ्यासक्रमासाठी " **पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर – एक अभ्यास** " या विषयावर २०१५ –२०१६ या शैक्षणिक वर्षात सादर केलेला संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरित्या पुर्ण केला आहे.

सदर संशोधन प्रकल्पामध्ये त्यांनी नमुद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहेत.

ठिकाण : पुणे
दिनांक :

मार्गदर्शक सही

डॉ.सुनिता बर्वे

(सिनीयर टेक्निकल ऑफीसर,

एन.सी.एल.पुणे.)

# ऋणनिर्देश


टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयामधील एम.फिल या पदवी करीता हा संशोधन प्रकल्प सादर करताना मला अनेकांचे सहकार्य लाभले आहे. पहिल्यांदा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांची मी अतिशय आभारी आहे. कारण या विद्यापीठाने सदर अभ्यासक्रम सुरू केला. नोकरी करत असतानाही मला या अभ्यासक्रमास प्रवेश मिळवून हा संशोधन प्रकल्प सादर करता आला तो या विद्यापीठामुळेच. त्यामुळे या विद्यापीठाची मी मनापासून ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधन प्रकल्प सादर करण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्याकडून संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल मी या विद्यापीठातील ग्रंथालयशास्त्र विभाग प्रमुख डॉ. खंदारे मॅडम आणि इतर कर्मचारी यांची ऋणी आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या मार्गदर्शिका डॉ. सुनिता बर्वे मॅडम यांची मी शतशः आभारी आहे, कारण त्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळेच मी आज हा संशोधन प्रकल्पपूर्ण करू शकले.

हे संशोधन कार्य करताना, सध्या मी कार्यरत असलेल्या महाविद्यालयाच्या प्रमुख ग्रंथपाल डॉ. अमिता प्रधान मॅडम, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट वडगांव बु. या महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. तादगे सर आणि माझा सर्व सहकारी वर्ग तसेच योगिता वाकचौरे मॅडम आणि राहुल विश्वे सर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल यांची मी अत्यंत ऋणी आहे.

याचबरोबर या शैक्षणिक कामामध्ये मला माझे पती,माझी आई आणि माझे इतर कुटुंबिय यांचे मोलाचे सहकार्य मिळाले त्यांचे मी मनापासून आभार मानते.

ठिकाण: पुणे — संशोधक

दिनांक: — (लिंगे सुनिता लक्ष्मण)

# अनुक्रमणिका


| अ.न. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| ● | संशोधकाचे प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV |
| | अनुक्रमणिका | V |
| | **प्रकरण १**<br>**प्रस्तावना** | |
| १.१ | प्रस्तावना | १ |
| १.२ | विषय निवडीचे महत्व | ३ |
| १.३ | संशोधनाची उद्धिष्टे | ३ |
| १.४ | संशोधनाची गृहितके | ४ |
| १.५ | संशोधनाची व्याप्ती | ४ |
| १.६ | संशोधन म्हणजे काय | ५ |
| १.७ | वर्णनात्मक संशोधन पद्धती | ७ |

| | | |
|---|---|---|
| १.८ | संशोधनाची साधने | ८ |
| १.९ | पूर्वाभ्यास समालोचन | ११ - १५ |
| | प्रकरण १ संदर्भसूची | १५-१७ |
| | **प्रकरण २**<br>**माध्यमिक शिक्षण आणि शैक्षणिक ग्रंथालये** | |
| २.१ | माध्यमिक शिक्षण संकल्पना | १८ |
| २. २ | माध्यमिक शिक्षणाचे ध्येय | १९ |
| २.३ | माध्यमिक शाळास्थापनेमध्ये ग्रंथालय जागेसंदर्भाची प्रमाणे | २० |
| २. ४ | शैक्षणिक ग्रंथालये | २१ |
| २. ५ | शालेय ग्रंथालयांची गरज | २२ |
| २. ६ | शालेय ग्रंथालयांची उद्धिष्टे | २४ |
| २. ७ | माध्यमिक शालेय ग्रंथालये | २५ |
| २. ८ | माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह | २६ |
| २. ९ | माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा | २८ |
| २. १० | माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयामध्ये ग्रंथपालाचा सहभाग/ महत्व स्थान | २९ |

| | | |
|---|---|---|
| २ . ११ | शालेय ग्रंथालयांची सद्य:स्थिती | ३0 |
| २ . १२ | शालेय ग्रंथालयासंदर्भात राज्य शासनाची जबाबदारी | ३१ |
| २ . १३ | शालेय ग्रंथालयासंदर्भात केंद्र शासनाची जबाबदारी | ३२ |
| २ . १४ | माध्यमिक शाळांच्या विकासासाठी मुदलियार आयोगाची कार्ये | ३३ |
| २ . १५ | नवे शैक्षणिक धोरण आणि शालेय ग्रंथालये | ३५ |
| २ .१६ | माध्यमिक शिक्षक | ३७ |
| २ .१७ | आजच्या शिक्षकाची गुणवत्ता व नीतिमत्ता | ३८ |
| | प्रकरण २ संदर्भसूची | ३९ |
| | **प्रकरण ३**<br>**पंढरपूर शहर आणि पंढरपूर शहरातील शाळा** | |
| ३ .१ | पंढरपूरची थोडक्यात माहिती | ४0 |
| ३ .२ | पंढरपूर शहरातील  शाळा | ४१-४२ |

| | | |
|---|---|---|
| ३.३ | संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या शाळा | ४३ |
| ३.३.१ | आपटे प्रशाला, पंढरपूर | ४४ |
| ३.३.२ | आपटे प्रशाला, पंढरपूर | ४५ |
| ३.३.३ | द.ह.कवठेकर प्रशाला, पंढरपूर | ४६ |
| ३.३.४ | विवेक वर्धिणी विद्यालय, पंढरपूर | ४७ |
| ३.३.५ | इंग्लिश मिडियम स्कूल, पंढरपूर | ४८ |
| ३.३.६ | लोकमान्य विद्यालय, पंढरपूर | ४९ |
| ३.३.७ | यशवंत विद्यालय, पंढरपूर | ५० |
| ३.३.८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय, पंढरपूर | ५१ |
| ३.३.९ | मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला, पंढरपूर | ५२ |
| ३.३.१० | राजाराम विद्यालय, पंढरपूर | ५३ |
| ३.३.११ | रूक्मिणी विद्यालय, पंढरपूर | ५४ |
| | प्रकरण ३ संदर्भसूची | ५५ |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण ४<br>माहितीचे संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण | | |
| ४.१ | ग्रंथपाल प्रश्नावली विश्लेषण | ५६-८८ |
| ४.२ | शिक्षक प्रश्नावली विश्लेषण | ८९-११६ |
| प्रकरण ५<br>निष्कर्ष आणि शिफारशी | | |
| | ग्रंथपाल प्रश्नावली निष्कर्ष/शिफारशी | ११७-११९ |
| | शिक्षक प्रश्नावली निष्कर्ष/शिफारशी | १२०-१२३ |
| | पुढील संशोधनासाठी दिशा | १२४ |
| | परिशिष्टे | |
| ● | संदर्भसूची | २१५-१२९ |
| ● | प्रश्नावली १.ग्रंथपाल प्रश्नावली | I-VI |
| ● | २.शिक्षक प्रश्नावली | VII -X |

# तक्त्यांची सूची

## ग्रंथपाल प्रश्नावली विश्लेषणाचे तक्ते


| तक्ता क्र. | तक्त्याचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शाळेची सर्वसाधारण माहिती | ५८ |
| २ | एकुण विद्यार्थी व शिक्षक संख्या | ५९ |
| ३ | ग्रंथालय सेवकवर्ग | ६१ |
| | ग्रंथालय सेवकवर्ग पुरेसा आहे का | ६२ |
| ४ | प्रत्येक वर्गास स्वतंत्र वेळापत्रक आहे का | ६२ |
| ५ | परीक्षेच्या काळात ग्रंथालयाची वेळ | ६३ |
| ७ | वाचकांसाठी  अभ्यासिका कक्ष | ६४ |
| ८ | वाचनकक्षाची विद्यार्थी क्षमता | ६४ |
| ९ | शिक्षकांसाठी अभ्यासिका | ६५ |
| १0 | ग्रंथालय समिती | ६६ |
| ११ | ग्रंथालय समितीमधील सदस्य | ६७ |
| १२ | ग्रंथालयाचा सरासरी खर्च | ६८ |
| १३ | मागील ३ वर्षाचा ग्रंथालयाच्या खर्चाचा तपशील | ६९ |
| १४ | ग्रंथनिवड | ७२ |

| | | |
|---|---|---|
| १५ | ग्रंथखरेदी | ७३ |
| १६ | एकुण ग्रंथ संख्या | ७५ |
| १७ | शिक्षकांना एकावेळेस दिली जाणारी ग्रंथसंख्या | ७७ |
| १८ | ग्रंथालय उपक्रम | ७८ |
| १९ | ग्रंथेत्तर साहित्य | ७९ |
| २0 | मुद्रित ग्रंथेत्तर साहित्य | ७९ |
| २१ | अमुद्रित ग्रंथेत्तर साहित्य | ८0 |
| २२ | नियतकालिके उपलब्धता | ८१ |
| २३ | नियतकालिकांची संख्या | ८१ |
| २४ | नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी | ८२ |
| २५ | एकावेळी किती नियतकालिके | ८३ |
| २६ | वृत्तपत्रे | ८३ |
| २७ | वृत्तपत्रांची संख्या | ८४ |
| २८ | कोणकोणत्या भाषेतील वृत्तपत्रे | ८५ |
| २९ | संगणक उपलब्धता | ८६ |
| ३0 | ग्रंथालयात संगणकाचा होणारा वापर | ८७ |

# आलेखाची सूची

## ग्रंथपाल प्रश्नावली विश्लेषणाचे आलेख


| आलेख क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | एकुण विद्यार्थी व शिक्षक संख्या | ६0 |
| २ | मागील ३ वर्षाचा ग्रंथालयाच्या खर्चाचा तपशील | ७0 |
| ३ | ग्रंथनिवड | ७२ |
| ४ | ग्रंथखरेदी | ७४ |
| ५ | एकुण ग्रंथ संख्या | ७६ |
| ६ | संगणक उपलब्धता | ८६ |

# शिक्षक प्रश्नावली विश्लेषणाच्या तक्त्यांची सूची


| तक्ता क्र. | तक्त्याचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रंथालयात किती दिवसातून जाता | ९० |
| २ | शिक्षकांची ग्रंथालयात जाण्याची वेळ | ९१ |
| ३ | ग्रंथालयाचा वापर अनिवार्य वाटतो का | ९६ |
| ४ | ग्रंथ खरेदीसाठी ग्रंथपालास शिफारस करता का | ९७ |
| ५ | कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदीस शिफारस | ९७ |
| ६ | वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रंथपालास | १०० |
| ७ | ग्रंथालयाद्वारे होणा-या कार्यक्रमात सहभाग | १०१ |
| ८ | ग्रंथालयाच्या वेळीची अपेक्षा | १०२ |
| ९ | वाचनकक्ष उपलब्धता | १०३ |
| १० | ग्रंथालयाचे वातावरण | १०५ |
| ११ | ग्रंथेत्तर साहित्य मिळते का | १०५ |
| १२ | इंटरनेट सुविधा उपलब्धता | १०६ |
| १३ | इंटरनेट सुविधेचा वापर आपण कशासाठी करता | १०७ |
| १४ | आवश्यक ती मदत वेळेत मिळते का | १०८ |
| १५ | हवे असलेले वाचनसाहित्य मिळते का | ११० |
| १६ | पाठ्यपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळतात का | ११२ |
| १७ | ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात का | ११३ |
| १८ | नियतकालिके मिळतात का | ११३ |
| १९ | ग्रंथसंग्रहाबाबत आपण समाधानी आहात का | ११५ |

# शिक्षक प्रश्नावली विश्लेषणाची आलेख सूची


| आलेख क्र. | आलेखाचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रंथालयात किती दिवसातून जाता | ९0 |
| २ | शिक्षकांची ग्रंथालयात जाण्याची वेळ | ९२ |
| ३ | ग्रंथालयास भेट देण्याचा प्रमुख हेतू | ९३ |
| ४ | आवश्यक असणारी माहिती मिळविण्यास अडचण निर्माण झाल्यास काय करता | ९४ |
| ५ | वाचनासाठी पुस्तकाची निवड कशी करता | ९५ |
| ६ | कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदीस शिफारस करता | ९८ |
| ७ | विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे उपाय | ९९ |
| ८ | ग्रंथालयाच्या वेळीची अपेक्षा | १0२ |
| ९ | वाचनकक्ष उपलब्धता | १0४ |
| १0 | इंटरनेट सुविधेचा वापर आपण कशासाठी करता | १0७ |
| ११ | इतर कोणत्या सेवासुविधा मिळाव्यात असे वाटते | १0९ |
| १२ | ग्रंथ उपलब्ध न झाल्यास काय करता | १११ |
| १३ | नियतकालिके  मिळतात का | ११४ |
| १४ | मागील काही वर्षापेक्षा ग्रंथालयाचा दर्जा सुधारला आहे का | ११५ |

# प्रकरण १ ले

# प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, यांच्या ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या एम.फिल. (M.Phil.) शिक्षणक्रमासाठी संशोधन प्रकल्प सादर करणे अनिवार्य असल्याने संशोधकाने संशोधनासाठी

**" पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर – एक अभ्यास"** हा संशोधन विषय घेतला आहे.

संशोधकाने घेतलेला विषय शिक्षणाशी संबंधित असल्याने डॉ.राधाकृष्णन म्हणतात त्याप्रमाणे "The purpose of Education is to help the free growth of the soul".व्यक्तिच्या आत्म्याला मुक्तपणे विकसित होऊ देणे व त्यासाठी मदत करणे हा शिक्षणाचा खरा हेतू आहे.

आपले विचार स्वत:साठी व भावी पिढयांसाठी संग्रहित करून ठेवावेत ही कल्पना मानवाच्या मनात रूजली.आपले विचार ग्रंथीत करण्यासाठी मानवाने स्थानिक, भौगोलिक, सांस्कृतिक परिस्थितीनुसार जी साधने योग्य वाटली आणि उपलब्ध झाली ती वापरून लेखनास प्रारंभ केला.भाव, भावना कल्पना इ.अक्षरबद्ध करून ग्रंथीत करण्यास सुरूवात केली आणि ज्या साहित्यावर ज्ञान अनुभव संग्रहित केले त्याला स्थूलमानाने ग्रंथ म्हटले जाऊ लागले.

भारतात अस्तित्वात असलेली प्रचलित शिक्षणपद्धती ही स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश शासनकर्त्यांनी घालून दिलेली पद्धती आहे. प्रारंभी प्राथमिक शाळेचे वर्ग त्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, त्यापुढे जाऊन विद्यापीठे, विज्ञान व तंत्रज्ञान संस्था यांच्याद्वारे दिले जाणारे उच्च शिक्षण व संशोधन अशी सर्वसाधारण शिक्षण व्यवस्था आहे. स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९४७ नंतर या पद्धतीत वेळोवेळी बदल सुचविण्यात येऊन ती आजच्या काळाला व राष्ट्रीय गरजांना सुसंगत अशी करण्याची प्रयत्न झाले. स्वतंत्र भारताचा नवा नागरिक उत्तम रितीने घडविला जावा यासाठी शिक्षण पद्धतीवर सर्वांगीण विचार करण्यासाठी वेळोवेळी विविध उच्चाधिकार आयोगांची स्थापना करण्यात आली. आयोगांनी केलेल्या सूचना व शिफारशींची अमंलबजावणी करण्याचे प्रयत्न झाले. विशेषत प्राथमिक स्तरावरील शिक्षणााचा दर्जा सुधारण्याचे बरेच प्रयत्न करण्यात आले. त्यातूनच सन १९८६ साली नव्या शैक्षणिक धोरणाचा जन्म झाला. देशातील भावी नागरिकांना सर्वोत्कृष्ट शिक्षण देण्याच्या हेतूने हे नवे शैक्षणिक धोरण आखण्यात आले. आपल्या महान देशाचा प्राचीन वारसा आणि आजच्या जगातील आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांच्याशी सुसंवाद साधून आदर्श भारतीय नागरिक घडविण्याच्या भावनेतून नवीन शैक्षणिक धोरणाचा अंगिकार करण्यात आला.

भारतीय शिक्षण प्रणालीला असे काळानुरूप आधुनिक आणि प्रगत स्वरूप देत असताना ग्रंथालयांना म्हत्वाचे स्थान देण्यात आले आहे. ग्रंथ आणि ग्रंथालये ही शिक्षण पद्धतीची अविभाज्य अंगे आहेत याची आपल्या देशातील शैक्षणिक विचारवंतांना जाणीव होती म्हणूनच शैक्षणिक क्षेत्रात विविध स्तरांवर ग्रंथालयांच्या स्थापनेला व विकासाला प्राधान्य देण्यात आले.

## १.२ विषय निवडीचे महत्व

विद्यालय हे शिक्षण देण्याचे प्रमुख केंद्र असते. विद्यालयात शिक्षण देणारे शिक्षक व शिक्षण घेणारे विद्यार्थी यांना विशेष महत्व आहे. विद्यार्थी दशेत शिक्षण घेत असताना अध्ययन करणे व ज्ञान संपादन करणे हा शिक्षणाचा प्रमुख हेतू असतो.

देशाचा उत्तम नागरिक घडविण्याचे कार्य शिक्षकांना करावयाचे असते. विद्यार्थ्यांची योग्य जडणघडण करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे कार्य अतिशय महत्वाचे असते.

पंढरपूरसारख्या विकसनशील शहरातील माध्यमिक शाळांची आजची स्थिती, तेथील शिक्षकांच्या समस्या, शाळांच्या ग्रंथालयाची उपलब्धता, तेथील शिक्षकांना ग्रंथालयातून मिळणाऱ्या सेवा सुविधा आणि शिक्षकांकडून होणारा ग्रंथालय सुविधांचा वापर यांचा अभ्यास करणे आवश्यक वाटल्याने संशोधकाने " पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर – एक अभ्यास " हा विषय संशोधनासाठी घेतला आहे.

## १.३ संशोधनाची उद्दिष्टे :

१. पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक ग्रंथालयाचा वापर कितपत करतात याचा शोध घेणे.

२. माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातून शिक्षकांना दिल्या जाणा या सेवा सुविधांचा अभ्यास करणे.

३. शिक्षकांच्या गरजेनुसार वाचनसाहित्य उपलब्ध होते किंवा नाही याचा अभ्यास करणे.

### १.४ संशोधनाची गृहितके :

पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना ग्रंथालयातून पुरेशा सोयी सुविधा मिळत नाहीत.

माध्यमिक शाळांमध्ये ग्रंथालयांचा शिक्षकांकडून पुरेसा वापर होतो.

### १.५ संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सोलापूर जिल्हयातील पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाच्या वापराचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पंढरपूर शहरातील पुढील माध्यमिक शाळांचा समावेश होतो.

१. आपटे प्रशाला, पंढरपूर

२. कवठेकर प्रशाला, नाथचौक पंढरपूर

३. द.ह. कवठेकर प्रशाला, पंढरपूर

४. विवेक वर्धिनी विद्यालय, संतपेठ पंढरपूर

५. इंग्लिश मिडियम स्कूल, पंढरपूर

६. लोकमान्य विद्यालय, पंढरपूर

७. यशवंत विद्यालय, पंढरपूर

८. अण्णा भाऊ साठे विद्यालय, पंढरपूर

९. मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला, पंढरपूर

१0. राजाराम विद्यालय, पंढरपूर

११. रूक्मिणी विद्यालय, पंढरपूर

पंढरपूर शहरातील हया ११ माध्यमिक शाळेतील शिक्षकांची यादृच्छिक नमुना निवड पद्धतीनुसार प्रत्येकी १0 प्रमाणे एकुण ११0 शिक्षकांकडून तसेच ग्रंथपालांकाडून प्रश्नावली भरून घेऊन माहिती गोळा करून त्याचा अभ्यास संशोधकाने केला आहे.

संशोधकाने हया शाळा निवडण्याचे मुख्य कारण म्हणजे या शाळांची एकुण विद्यार्थीसंख्या ५00 पेक्षा जास्त आहे आणि शिक्षकसंख्या १0 पेक्षा जास्त आहे.

**१.६ संशोधन म्हणजे काय**

संशोधन या शब्दाला इंग्रजी भाषेत 'Research' असे म्हणतात. Re म्हणजे पुन्हा आणि Searchम्हणजे शोधणे.याचाच अर्थ असा की, एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा शोधणे म्हणजे संशोधन होय.

संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेला सत्याचा शोध. ज्ञानाचे क्षेत्र व्यापक करण्याकरिता समस्याचे आकलन व निराकरण करण्याकरिता आणि एकंदर मानवी जीवन प्रगतशील व समृध्द करण्याकरिता संशोधन हे महत्वाचे साधन आहे. ज्ञान मिळविण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करण्याच्या प्रक्रियेला संशोधन म्हणता येईल. संशोधनाची प्रक्रिया वस्तुनिष्ठ असावी लागते तरच संशोधक सर्वार्थी अशा निष्कर्षाप्रत येतो. संशोधनाची सुरूवात प्रश्नात्मकतेने होते आणि शेवट हा निष्कर्षाने होतो. संशोधन या संकल्पनेतुन निर्माण झालेली शास्त्रे, त्याच्यासाठी उपयोजलेल्या पध्दती त्यांचे विविध प्रकार, यांची साधन चिकित्सा या सर्व व्यवहारातुन संशोधन विद्या ही संकल्पना सिध्द झालेली आहे.

संशोधन ही फक्त लवचिक विश्वव्यापक अशी संकल्पना किंवा ज्ञान व्यवहारापुरती मर्यादित संज्ञा राहिलेली नसुन संशोधन हे एक शास्त्र म्हणून सिध्द झाले आहे.

संशोधन ही समस्या निराकरणाची सुव्यस्थित प्रक्रिया आहे. मानवी मनाला अस्वस्थ करणा–या बहुविद्य समस्यांचा सप्रमाण व विश्वसनीय समाधानासाठी आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन व विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्था व प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

व्याख्या :

१. "संशोधन म्हणजे ज्ञानाच्या शाखेत नविन तथ्ये किंवा तत्वे शोधण्यासाठी जुनी तत्वे तपासण्यासाठी काळजीपुर्वक व पध्दतशीरपणे केलेला अभ्यास होय".

२. "एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे आणि त्याची अधिकाधिक कारणमीमांसा करणे म्हणजे संशोधन होय".

३. लेटमन व मोरी यांच्या मते "संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची आकारबध्द सुव्यस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया होय".

४. "सत्यशोधनाची पध्दत म्हणजेच संशोधन होय." क्लिफर्ड मुडी

५. "संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेल्या सत्याचा किंवा अज्ञाताचा शोध", एम. एच. गोपाल.

६. "संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध" चार्ल्स बुशा आणि हार्टर.

सामाजिक शास्त्रातील संशोधन हे वैज्ञानिक पातळीवरील संशोधनासारखे प्रयोगाच्या पातळीवर सिध्द करता येत नाही. सामाजिक शास्त्रांना ऐतिहासिक महत्व आहे.

विज्ञानाप्रमाणे केवळ तात्विक व पृथक्करणात्मक भुमिकेवरून त्यांचा अभ्यास करता येत नाही. त्यासाठी सदैव ऐतिहासिक व संश्लेषणात्मक दृष्टी स्वीकारावी लागते. उत्तरे

शोधण्यासाठी जे प्रश्न पुढे ठेवले जातात त्यांच्या वैशिष्टयावरून संशोधनाचे उद्दिष्ट ठरलेल्या योग्य संशोधनाच्या प्रक्रियेचे स्वरूप निश्चित करता येते.

शैक्षणिक संशोधन विविध पद्धतीने केले जाते.

संशोधनाच्या एकुण तीन पद्धती आहेत.

१. ऐतिहासिक संशोधन पद्धती

२. प्रायोगिक संशोधन पद्धती

३. वर्णनात्मक संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी वरील पद्धतींपैकी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

## १.७ वर्णनात्मक संशोधन पद्धती

वर्णनात्मक पध्दतीमध्ये संशोधकाने निवडलेल्या कोणत्याही विषयाचा किंवा समस्याचा सर्वकष अभ्यास करण्यात येतो आणि यथार्थ व संपुर्ण माहिती गोळा करण्यात येते. संबंधीत गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण करून चिकित्सा किंवा स्पष्टीकरण देता येते. म्हणजे विश्लेषणानंतर तत्वचिंतनाने निघालेल्या निष्कर्षावरून संशोधकाला परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य त्या मार्गदर्शक सूचना करता येतात. विशिष्ट व्यक्तिच्या, समुहाच्या व स्थितीच्या वैशिष्टयाचे व लक्षणाचे यथा तथ्य वर्णन करणे हाच वर्णनात्मक अध्ययनाचा प्रमुख हेतु असतो.

व्याख्या :

"कोणत्याही घटनेच्या सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते अशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन म्हणतात".

सर्वसाधारणपणे सामाजिक संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरली जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे सामाजिक शास्त्रात मोडत असल्याने संशोधकाने वर्ण नात्मक संशोधन पद्धती निवडली आहे.

वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये संशोधन कार्यासाठी माहिती जमविण्याची अनेक साधने आहेत. त्यामध्ये साधारणतः

१.८ संशोधनाची साधने:

१. निरिक्षण

२. प्रश्नावली

३. मुलाखत

४. मानसशास्त्रीय कसोटया

५. पडताळासूची इत्यादींचा समावेश होतो.

त्यापैकी संशोधकाने प्रश्नावली आणि आवश्यक त्या ठिकाणी मुलाखत या साधनांचा वापर केला आहे.

## प्रश्नावली :

प्रश्नावली पद्धतीत प्रश्नांची एक क्रमबद्ध व सुसंगत अशी मालिका तयार केली जाते. संशोधनासंबंधी प्राथमिक माहिती संकलित करणे हा प्रश्नावलीचा मुख्य हेतु असतो. प्रश्नावलीतील प्रश्न लेखी स्वरूपाचे असतात व त्यांची उत्तरेही लेखी स्वरूपात दिली जातात. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक व राजकीय सर्वेक्षणांची तथ्यात्मक माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावली पद्धती अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. ज्यावेळी संशोधनासाठी निवडलेला लक्षसमुहाचा नमुना भौगोलिकदृष्टया दुरवर पसरलेला असतो तेव्हा प्रश्नावलीद्वारेच माहिती जमा केली जाते.

## प्रश्नावलीची व्याख्या :

१. बोगार्डस यांच्या मते, "प्रश्नावली म्हणजे भिन्न भिन्न व्यक्तिंकडून ज्यांची उत्तरे मागविली जातात अशा प्रश्नांची मालिका होय."

२. गुड व हॅट यांच्या मते, "सर्वसामान्यपणे प्रश्नावली हे प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचे असे एक तंत्र आहे की ज्यात कागदावरील प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वत: भरतो."

प्रश्नावलीमुळे प्रमाणित उत्तरे प्राप्त होतात व ज्यांचा उपयोग सारणीकरण व सांख्यिकीसाठी होतो. तसेच प्रश्नावलीमुळे आपल्या संशोधनाची चौकट ठरविण्यात मदत होते.

संशोधकाने माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे. प्रश्नावलीमध्ये मुक्त प्रश्नावली व बंद प्रश्नावली असे दोन प्रकार पडतात. संशोधकाने शिक्षकांकडून ग्रंथालयाचा होणारा वापर याविषयी माहिती मिळविण्यासाठी शिक्षकांसाठी एक प्रश्नावली व ग्रंथालयाची मुलभूत माहिती मिळविण्यासाठी ग्रंथपालास एक प्रश्नावली अश्या दोन वेगवेगळया प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित केली आहे.

मुलाखत :

प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली बरोबरच मुलाखत हे एक प्रभावी आणि उत्तम साधन आहे. संशोधनासाठी योग्य व विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी समोरा समोर बसून केलेले संभाषण म्हणजे मुलाखत होय. प्रश्नावली तयार करताना जे निकष लावण्यात येतात ते मुलाखतीच्या बाबतीत ही लावावे लागतात. मुलाखत आणि प्रश्नावली यामधील महत्वाचा फरक असा की मुलाखत हे साधन स्थानिक पातळीवर वापरण्यात येते. समोरील व्यक्तीचे अनुभव, भावना, मते, विचार, समस्या इ. विषयी माहिती मिळविल्यास मुलाखत उपयुक्त ठरते.

मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा या दोन्ही व्यक्ती स्पष्ट व गंभीर आणि स्वत:च्या भावनांवर नियंत्रण ठेवणा-या असतील तर मुलाखत अधिक परिणामकारक ठरते. मुलाखतीमध्ये दोन्ही व्यक्तींचा प्रत्यक्ष संपर्क होत असल्याने शंका निरसन ताबडतोब करता येते. मुलाखतीत अभ्यासकाने विचारलेल्या प्रश्नांना मुलाखत देणारी व्यक्ती लेखी उत्तरे देण्याऐवजी तोंडीच उत्तरे देते. म्हणून मुलाखत घेताना प्रश्नकर्त्याने उत्तरे जशीच्या तशी उतरवुन घ्यावीत.

मुलाखतीचा फायदा असा की एखाद्या प्रश्नाबद्दल किंवा मुद्दयाबद्दल उत्तरदात्याला स्पष्टीकरण हवे असल्यास ते प्रश्नकर्ता लगेच देऊ शकतो. त्यामुळे कोणताही प्रश्न अनुत्तरित राहत नाही. त्याचप्रमाणे मुलाखतीमध्ये प्रश्नकर्ता मिळालेल्या उत्तरावर आधारित उपप्रश्न विचारू शकतो.

त्यामुळे वरील संशोधन साधनांपैकी संशोधकाने प्रश्नावली व आवश्यक त्या ठिकाणी मुलाखत पद्धतीचा वापर केला आहे.

**पूर्वाभ्यास समालोचन ः**

पूर्वाभ्यासाचे समालोचन म्हणजे पुर्वी झालेल्या आपल्या विषया संदर्भातील तशी संशोधने झाले आहेत का? याची माहिती जाणून घेणे. तसेच विषयाशी संबधीत सुसंगत व तर्कसंगत पध्दतशीर माहिती कशी घ्यायची व ती कशी अंतर्भूत करायची याची माहिती मिळवणे होय.

संशोधन करीत असताना संशोधकास त्या अभ्यास विषयाच्या अनुषंगाने आढावा घ्यावा लागतो. त्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित प्रबंध, नियतकालिके, अहवाल, पुस्तके इत्यादी साधनांचा वापर करावा लागतो. या मागचा उद्देश म्हणजे संबंधित विषयाची पार्श्व भूमी पाहून त्या मागची संपूर्ण माहिती प्रकाशित करणे होय. यामुळे अभ्यासकास मागील घडामोडीचा अभ्यास करून पुढे चांगल्या निष्कर्षापर्यंत पोचता येते. पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेत असताना मागील संकल्पना, उपयोगात आणलेली संशोधन पद्धती आणि निष्कर्ष हे पुढील उद्दिष्टे गाठण्यासाठी उपयुक्त ठरत असतात.

पूर्वी या विषयावर संशोधन झालेले नाही याची संशोधकाने पूर्ण खात्री केलेली आहे आणि त्यानुसारच हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने संशोधन अभ्यास विषयासंबंधीत खालील प्रमाणे प्रकाशित तसेच अप्रकाशित साहित्यांचा आढावा घेतला आहे.

१. Agbo,A.D. (2015). “School libraries and development of library skills in Nigerian Secondary education system” *International Science congress Association* –Research Journal on Library science vol.3(2),ISSN No.2320-8929. या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये यांचा हा संशोधन लेख प्रसिध्द झाला आहे. या लेखामध्ये शालेय ग्रंथालयीन सेवा सुविधा

याबद्दल माहिती दिली आहे.तसेच शिक्षक आणि ग्रंथपाल आपली कौशल्ये वापरून ग्रंथालयीन वातावरण कशा प्रकारे आनंदी ठेऊ शकतील याविषयी माहिती दिली आहे.

२. Omera, Johnson. (June-2013). “Teacher’s utilization of Secondary School libraries in Idah Local Government Area”,kogi state University,Anyigba. *African educational reasearch journal*,vol.1(2)p96-101. या संशोधन प्रबंधामध्ये संशोधकाने शालेय ग्रंथालयातील वाचनसाहित्य, शालेय ग्रंथालयातून कोणत्या सेवा दिल्या जातात आणि त्या सेवांचा शिक्षकांनी स्वतःसाठी व विद्यार्थ्यांसाठी कसा वापर करावा याची माहिती दिली आहे.

३. Mahajan, Preeti. (2009) “School Libraries in India: Present day Scenario” Punjab University, Chandigrah, India. *Library Philosophy and Practice* (e-journal) paper No.371.ISSN 1522-022. या ऑनलाईन नियतकालिकामध्ये यांचा हा संशोधन लेख प्रसिध्द झाला आहे. प्रसिद्ध झालेल्या या लेखामध्ये भारतातील शालेय ग्रंथालयाची सध्याची प्रतिनिधिक स्थिती, शालेय ग्रंथालयांची मानके आणि शालेय ग्रंथालयाचे भौतिक वातावरण याविषयी माहिती दिली आहे.

४. Nwachukwu,V.N. (2005) “Utilizing the school library facilities for enriching curriculum and instruction for diverse learners at the primary level education”. *Global journal for research anayalisis,*vol.3(3),March-2014,ISSN No.22778160 या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये यांचा हा शोध निबंध प्रसिध्द झाला आहे.या संशोधन लेखामध्ये

शालेय ग्रंथालयाचे महत्व,शालेय अभ्यासक्रम निर्मितीमध्ये ग्रंथालयाचे स्थान याविषयी माहिती दिली आहे.

५. Dike, V. W. (2000)"School Library facilities required for successful implementation of the Universal Basic education in Nigeria" Nigerian school library Association's 10th Annual conference.*Library philosophy & practice*,vol.4(2) ISSN No.1522-0222 मध्ये लेखकाने संशोधन लेख सादर केला आहे.या लेखामध्ये शालेय ग्रंथालयीन सेवा सुविधांविषयी तसेच शैक्षणिक विकासामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व याविषयी माहिती दिली आहे.

६. Andrade and Vergueiro (1996) "Collection Development in Academic Libraries: A Brazilian Library's Experience", *New library world,* vol.97(4),pp.15-17. यांचा हा संशोधन लेख प्रसिध्द झाला आहे. या शोध निबंधामध्ये शैक्षणिक ग्रंथालयाच्या एकुण वाचन साहित्याच्या संग्रहाबद्दल माहिती दिली आहे.

७. Gupta, Ranjana. (2013). "Information needs and seeking behaviour of the teachers of Allahabad University: a study" *(Ph.D.Thesis)* Bundelkhand University,Jhansi. यांच्या पीएच.डी.शोध प्रबंधामध्ये अलाहाबाद विद्यापीठातील शिक्षकांच्या माहितीच्या गरजा याविषयी माहिती दिली आहे.

८. Selvakumar, P. (2011). "The status of high school and higher secondary school libraries in karur district: a study" *(Ph.D. Thesis)*, Tamilnadu, India. यांच्या पीएच.डी.शोध प्रबंधामध्ये भारतातील

ग्रंथालयांचा इतिहास आणि करूर जिल्हयातील माध्यमिक शालेय ग्रंथालयाची सध्याची स्थिती आणि भविष्यकालीन सुधारणांविषयी माहिती दिली आहे.

९. Jain, Sudarshan Kumar. (2001) "Library and information services in senior secondary schools: problems and prospects based on the study of senior secondary schools in Delhi" Ph.D.Thesis, Bundelkhand University याच्या पीएच.डी. शोध प्रबंधामध्ये उच्च माध्यमिक शालेय ग्रंथालयीन सेवा सुविधांविषयी तसेच भारतातील शालेय शिक्षणाची स्थिती याविषयी माहिती दिली आहे.

१०. Mohapatra, T. (1991). "Problem of Secondary School Teachers: A Comparative Study of Government and Private School Teacher. (*Ph.D. Thesis)*. Utkal University, Cuttack. या पीएच .डी.शोध प्रबंधामध्ये संशोधकाने खाजगी माध्यमिक शाळा व सरकारी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समस्यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.सदर शोधप्रबंधाचा संशोधकाने आपल्या संशोधनादरम्यान थोडक्यात आढावा घेतला आहे.

११. C.L. Kaul and J.K.Gupta. (1990) "A Sample Study of School Library Facilities and their Utilisation in Secondary and Higher Secondary School of four selected States: Independent Study". (*Ph.D. Thesis)* National Council of Education Research and Training, New Delhi. या पी.एचडी.प्रबंधामध्ये संशोधकाने माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि त्यांचा वापर याविषयी माहिती दिली आहे.संशोधकास याचा उपयोग प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी झाला.

१२. वास्कर, आनंद. (२००६)'माध्यमिक शिक्षण आणि शालेय व्यवस्थापन' याज्ञी प्रकाशन, नाशिक. या पुस्तकामध्ये लेखकाने माध्यमिक शिक्षणपद्धती व माध्यमिक शाळा स्थापनेसाठीचे निकष याविषयी माहिती दिली आहे. त्याचा उपयोग संशोधकास प्रकरण दुसरे लिहण्यास झाला.

१३. दुनाखे, अरविंद. (२००५)'भारतीय शिक्षणपद्धती व माध्यमिक शिक्षण ' नूतन प्रकाशन, पुणे. या पुस्तकामध्ये लेखकाने भारतीय शिक्षणपद्धती व त्या पद्धतीचा होत गेलेला विकास याविषयी माहिती दिली आहे. त्याचा उपयोग संशोकास प्रकरण दुसरे लिहण्यास उपयोग झाला.

मराठी संदर्भसूची:


१. कुंभोजकर, ग.वि. (२००२). *संशोधन पध्दती व संख्याशास्त्र*. कोल्हापूर: फडके प्रकाशन.पृ. १९.

२.निकोसे, सत्त्यप्रकाश, (२००७). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्वती*. नागपुर: याज्ञी प्रकाशन. पृ.क ३८—३९.

३.रिसवाडकर, म. रा. (२००९). *संशोधन व्याख्या आणि पध्दती*. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृ. १-३.

संदर्भसूची :-


1. Agbo, A. D. (2015).School libraries and development of library skills in Nigerian Secondary education system. *International Science congress Association –Research Journal on Library science,* 3(2).
2. Andrade and Vergueiro (1996).Collection Development in Academic Libraries: A Brazilian Library's Experience. *New library world*, 97(4), 15-17.
3. C.L. Kaul and J.K.Gupta. (1990) A Sample Study of School Library Facilities and their Utilisation in Secondary and Higher Secondary School of four selected States: Independent Study. *(Ph.D.Thesis)* National Council of Education Research and Training, New Delhi.
4. Dike, V. W. (2000*).* School Library facilities required for successful implementation of the Universal Basic education in Nigeria. *Library philosophy & practice*,4(2),7-9.
5. Gupta, Ranjana. (2013). Information needs and seeking behaviour of the teachers of Allahabad University: a study *(Ph.D.* Thesis). Bundelkhand University, Jhansi.
6. Jain, Sudarshan Kumar (2001) Library and information services in senior secondary schools: problems and prospects based on the study

of senior secondary schools in Delhi.(*Ph.D.*Thesis). Bundelkhand University, Jhansi.

7. Mahajan, Preeti. (2009*)*. School Libraries in India: Present day Scenario Punjab University, Chandigrah, India. *Library Philosophy and Practice (e-journal)* 371.
8. Nwachukwu, V. N. (2005). Utilizing the school library facilities for enriching curriculum and instruction for diverse learners at the primary level education. *Global journal for research anayalisis,*3(3), 77-81.
9. Omera, Johnson. (June-2013). Teacher's utilization of Secondary School libraries in Idah Local Government Area, kogi state University, Anyigba*. African educational reasearch journal*,1(2), 96-101.
10. Selvakumar P.(2011 ) The status of high school and higher secondary school libraries in karur district: a study. *(Ph.D. Thesis)* Tamilnadu, India.
11. T. Mohapatra.(1991) Problem of Secondary School Teachers: A Comparative Study of Government and Private School Teacher. (*Ph.D. Thesis)* Utkal University, Cuttack.

# प्रकरण २ रे

# माध्यमिक शिक्षण आणि शैक्षणिक ग्रंथालये

प्रस्तावना :

२.१ माध्यमिक शिक्षण संकल्पनाः

माध्यमिक शिक्षणाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न वेगवेगळया विद्वानांनी वेगवेगळया पद्धतींनी केला आहे. संयुक्त महाराष्ट्र राज्याची १९६0 साली स्थापना झाली. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर माध्यमिक शिक्षण मंडळ व विभागीय माध्यमिक शिक्षण मंडळे यांच्या स्थापनेसाठी १९६५ साली कायदा करण्यात आला. या कायदयानुसार माध्यमिक शिक्षणाचा अर्थ व स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

“माध्यमिक शिक्षण म्हणजे कुमारावस्थेच्या किंवा पौंगंडावस्थेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दिले जाणारे सर्वसामान्य तांत्रिक व्यावसायिक किंवा विशेष शिक्षण होय. तसेच प्राथमिक शिक्षणानंतर लगेच दिले जाणारे आणि भारतातील विद्यापीठ कायदयान्वये निर्माण झालेल्या विद्यापीठाकडून नियंत्रित केल्या जाणा या शिक्षणापूर्वी दिले जाणारे शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षण होय”.

माध्यमिक पुनर्रचनेसाठी नेमलेल्या समितीने माध्यमिक शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. “प्राथमिक शाळांचा परिसर ज्यांच्या विकासासाठी उपयुक्त राहिलेला नाही परंतु शाळेच्या मार्गदर्शनाशिवाय ज्यांना समाजात वावरता येणार नाही तसेच व्यावसायिक शिक्षण देणा्या संस्था अथवा महाविद्यालये यांच्यासाठी जे अजून अपरिपक्व आहेत अशा सर्व साधारण व्यक्तींच्या विकासासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षण होय.

**माध्यमिक शिक्षणाचे महत्व ः** व्यक्तिच्या कुमारावस्थेचा काळ व माध्यमिक शिक्षणाचा काळ साधारणपणे एकाचवेळी येतो. कुमारावस्थेचा काळ हा व्यक्तिमत्वाच्या विकासाच्या दृष्टीने फार महत्वाचा असतो. बालकाचा स्वास्थपूर्ण सर्वांगीण विकास करण्यात माध्यमिक शिक्षणाचा महत्वाचा वाटा असतो.

माध्यमिक शिक्षणावर शिक्षणाच्या अन्य स्तरावरील गुणात्मक प्रगती अवलंबून असते. आदर्श नागरिक होण्यासाठी आवश्यक गुण व मूल्यांचा विकास प्राथमिक /माध्यमिक शिक्षणाच्या काळात करता येतो.

**२. २ माध्यमिक शिक्षणाचे ध्येय ः**

कोणत्याही राष्ट्रामध्ये शिक्षणाची ध्येये अथवा उद्दिष्टे एकदा निश्चित केली की ती कायमस्वरूपी तशीच राहत नाहीत. राजकीय सामाजिक आर्थिक परिस्थितीनुसार ती बदलावी लागतात. शिक्षण आयोगाच्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की “As political, social and economic conditions change and new problems arise,it becomes necessary to re-examine carefully and re-state clearly the objectives which education at each definite stage should keep in view”.

## २ . ३ माध्यमिक शाळास्थापनेमध्ये ग्रंथालयजागेसंदर्भाची प्रमाणे ः

- जागा ः शाळेच्या स्थापनेसाठी जागा हा निकष अतिशय महत्त्वाचा आहे . शाळेची जागा भर वस्तीपासून दूर परंतु प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरापासून साधारणतः एक किलोमीटरच्या आत असावी . शाळेच्या सर्व गरजा कीडांगण प्रयोगशाळा ग्रंथालय वर्गखोल्या इत्यादी गरजा भागतील एवढी जागा असावी . शाळेच्या भविष्यकालीन विकासाचा विचार शाळेच्या जागा निवडीच्या वेळेस केलेला असावा .
- **इमारत** ः शाळेस पक्की इमारत असावी . इमारतीची रचना अशी असावी की ज्यायोगे प्रत्येक खोलीत भरपूर सूर्य प्रकाश येईल व हवा खेळती राहील . इमारत बांधताना भविष्यकालीन विस्ताार लक्षात घेऊन इमारत बांधावी .

### इमारतीतील आवश्यक बाबी

- **ग्रंथालय** ः विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अवांतर वाचन अत्यंत आवश्यक असते . यासाठी ग्रंथालयाची सोय प्रत्येक शाळेत असणे आवश्यक आहे . सध्याच्या ज्ञानाच्या युगात ग्रंथरूपी गुरूंची प्रत्यक्ष गुरूइतकीच गरज आहे . वाचनाच्या सवयीमुळे विद्यार्थ्यास स्वयं अध्ययनाची सवय लागते व ती संपूर्ण जीवनभर पुरते . वाचनामुळे फुरसतीचा वेळ सत्कारणी लागतो . वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास होतो .

  शाळेतील ग्रंथालय इमारातीच्या एका बाजूस असावे ग्रंथालयात पुरेशी पुस्तके, कपाटे, टेबल, खुर्च्या व इतर आवश्यक फर्निचर असावे . ग्रंथालयात थोर लेखक शास्त्रज्ञ इत्यादींची छायाचित्रे लावावीत .

- **शालेय ग्रंथालयाच्या जागेची प्रमाणे:-**

शालेय ग्रंथालयासाठी शाळेने किती जागा उपलब्ध करून द्यावी यासंबंधी ब-याच तज्ज्ञांनी आणि संघटनांनी आपली मते व्यक्त केली आहेत. त्यापैकी काही...

**इंग्लंडमधील कार्नेजी ट्रस्टच्या** शालेय ग्रंथालयासंबंधी अहवालात शालेय ग्रंथालयात एका वेळी ५0 ते ६0 विद्यार्थी बसण्याची सोय असावी आणि प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ३५ ते ४0 चौ. फूट जागा असावी असे सुचविले आहे.

**अमेरिकन लायब्ररी असोसिएशनने** शालेय ग्रंथालयाच्या इमारतीसंबंधी विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीने दर विद्यार्थ्यामागे २५ ते ३0 चौ. फूट जागेची शिफारस केली आहे आणि ग्रंथालयात एका वेळी ५0 ते ७0 विद्यार्थी बसण्याची सोय असावी असे मत व्यक्त केले आहे.

**डॉ. रंगनाथन** यांनी वाचनकक्षात एका वेळी ५0 ते ५५ विद्यार्थी बसण्याची सोय असावी आणि प्रत्येक विद्यार्थ्यासाठी २५चौ. फूट जागा असावी असे सुचविले आहे.

## २. ४ **शैक्षणिक ग्रंथालये** ः

कोणत्या ना कोणत्या शैक्षणिक संस्थेशी संबंधित असणारे ग्रंथालय हे शैक्षणिक ग्रंथालय असते.

सामान्यपणे औपचारिक शिक्षणपद्धतीमध्ये पुढील तीन टप्प्यांमधील ग्रंथालयांचा समावेश होतो.

१. शालेय ग्रंथालय (School Libraries)

२ . महाविद्यालयीन ग्रंथालय (College Libraries)

३ . विद्यापीठ ग्रंथालय (University Libraries)

**२ . ५ शालेय ग्रंथालयांची गरज ः**

शालेय शिक्षणात केवळ कमिक पुस्तकांवर अवलंबून राहण्याची जी वृत्ती आढळते त्यामुळे शालेय शिक्षणाचा दर्जा खालावला आहे . म्हणून पाठयपुस्तकांबरोबर इतर अनुषंगिक ग्रंथांची आणि वाचनसाहित्याची ओळख त्यांना त्यांच्या शालेय जीवनातच करून दिली पाहिजे . त्यासाठी शाळा चालकांनी त्यांना सुसज्ज ग्रंथालयाच्या सुविधा निर्माण करून दिल्या पाहिजेत . आज बहुसंख्य शाळांतून शिक्षक आणि विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवांचा लाभ मिळत नाही . ीह स्थिती सुधारण्यासाठी आणि शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढाविण्यासाठी शालेय ग्रंथालयाची फार गरज आहे .

आज ज्ञानाच्या कक्षा एवढया रूंदावल्या आहेत की वर्गात केवळ पाठयपुस्तकांतून दिल्या जाण्या-या शिक्षणातून विद्यार्थ्यांना ख-या अर्थाने ज्ञानप्राप्ती होऊ शकत नाही . विद्यार्थ्यांमध्ये कोणतीही गोष्ट जाणून घेण्याची, शिकण्याची जी बौद्धिक जिज्ञासा असते तिची पूर्ती झाल्याशिवाय त्यांना ख-या अर्थाने शिक्षण मिळाले असे होत नाही . घ्रंथालये ही या जिज्ञासापूर्तीचे प्रभावी साधन आहे . ही जिज्ञासापूर्ती करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लावून त्यांना वाचनसाहित्य उपलब्ध करून देऊन त्याचा वापर करण्याचे शिक्षण देण्याचे आणि पूर्वापार परंपरेने चालत आलेल्या कंटाळवाण्या अध्यापन पद्धतीत सुधारणा करण्याचे महत्वाचे कार्य शाळांतून उत्तम ग्रंथालये असतील तरच करता येईल . शालेय विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची संधी मिळाली नाही, तर ते ख-या

शिक्षणापासून वंचित राहतील. या संदर्भात न्या. एम. सी. छगला यांनी आपल्या "दि इंडिव्हिज्युल ॲंड दि स्टेट" या ग्रंथात आपले विचार व्यक्त करताना म्हटले आहे,

"जर एखादा विद्यार्थी केवळ कमिक पुस्तकांचाच अभ्यास करून शालेय शिक्षण पुरे करिल तर तो मुलगा सुशिक्षित झाला असे मी मानणार नाही. विद्यार्थ्याला हवी असलेली माहिती स्वत: च प्रयत्नपूर्वक शोधून काढण्याचे शिक्षण देणे हेच मुळी शिक्षणाचे उद्दिष्ट असते. म्हणून शिक्षण आणि विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाच्या चाकोरीबाहेर पडून त्यांना नवनवीन गोष्टींचा शोध घेता यावा यासाठी शाळेत सुसज्ज असे ग्रंथालय असणे आवश्यक आहे". न्या. छगला यांचे हे म्हणणे शाळा चालकांनी ध्यानात घ्यायला हवे.

शालेय जीवनातच विद्यार्थ्यांच्या हाती चांगले ग्रंथ दिले तर त्यांच्या भावी शैक्षणिक जीवनातील वाटचालीसाठी शिदोरी मिळू शकते. घ्रंथालयांना शिक्षण संस्थेचे हृदय म्हटले जाते कारण शैक्षणिक संस्थेच्या सर्व हालचाली या हृदयाच्या स्पंदनावर अवलंबून असतात. म्हणून शाळांनी हे हृदय चांगले ठेवले तर विद्यार्थ्यांना चांगली ग्रंथालयसेवा मिळू शकेल आणि शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. भारत सरकारने नेमलेल्या शिक्षण आयोगाने आपल्या अहवालात शालेय ग्रंथालायाच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करताना म्हटले आहे,

"आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड आणि सवय निर्माण करून ती वाढीला लावण्याच्या कामाला शाळांनी प्राधान्य दयायला हवे. याचाच अर्थ असा की शाळांतून चांगली ग्रंथालये निर्माण करून त्यामधून त्यांना चांगली ग्रंथालय सेवा उपलब्ध करून दयायला हवी. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या गरजा भागविण्यासाठी, त्यांचे छंद, आवडी जोपासण्यासाठी शाळांतून चांगली ग्रंथालये असणे आवश्यक आहे. पुरोगामी शैक्षणिक धोरणे प्रत्यक्षात आणण्यासाठी शालेय ग्रंथालय हे एक आवश्यक आणि प्रभावी साधन आहे..."

ग्रंथालयाचे महत्त्व हे त्या ग्रंथालयातील ज्ञानसाधनांचा वापर किती होतो यावर अवलंबून असतो. म्हणून शाळा चालकांनी डॉ. रंगनाथन यांच्या ग्रंथालय शास्त्राच्या पाच सुत्रांची अंमलबजावणी करून ग्रंथालय स्थापन करून दिले तर शालेय शिक्षणाची उद्दिष्टे साध्य होण्यास फारसा अवधी लागणार नाही.

## २. ६ शालेय ग्रंथालयांची उद्धिष्टे ः-

शाळेतील शिक्षण जन्मभर पुरत नाही यास्तव ग्रंथ हेच कायमचे गुरू होत हे वचन लक्षात ठेऊन विद्यार्थ्यांना चांगले ग्रंथ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या साहाय्याने त्यांना त्यांच्या विषयांचा सर्वांगीण अभ्यास करण्यास प्रवृत्त करणे हे शालेय ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे. विद्यार्थ्यांना विविध विषयावरील ग्रंथाचा परिचय करून देऊन त्यांना वाचन करण्यास प्रवृत्त करणे ही शालेय ग्रंथालयाची आहे. ग्रंथालयीन साधनांचा शालेय शिक्षणात अधिकाधिक वापर व्हावा म्हणून शालेय ग्रंथालय शालेय अभ्यासक्रमाचाच एक भाग बनले पाहिजेत.

शालेय ग्रंथालयात विद्यार्थ्यांच्या विचारांची जडणघडण करण्याच्या उद्देशाने ग्रंथपालाने विद्यार्थ्यांना ग्रंथालय साहित्याचा वापर करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. स्वत:च्या शंका, अडचणी घेऊन ग्रंथालयात येणा या विद्यार्थ्यांना संदर्भ ग्रंथाचा वापर करण्याचे शिक्षण आणि मार्गदर्शन ग्रंथपालाने करावयास हवे. शालेय ग्रंथालयाचे स्वरूप प्रयोगशाळेसारखे असावे तेथे विद्यार्थ्यांना हवी असलेली माहिती त्यांना स्वत:लाच शोधून काढायला प्रोत्साहान देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून ज्ञानार्जनात स्वावलंबी बनण्याचे शिक्षण त्यांना मिळावयास हवे. याशिवाय,

- छोटया मुलांच्या मनात पुस्तकांविषयी आवड निर्माण करणे.

- सावकाश पण जाणीवपूर्वक वाचनाची सवय वाढविणे.
- पुस्तकांचा उपयोग करून नवीन माहिती व ज्ञान मिळविण्याची सवय त्यांच्यामध्ये विकसित करणे. इत्यादी शालेय ग्रंथालयांची मुख्य उद्दिष्ते आहेत.

## २. ७ माध्यमिक शालेय ग्रंथालये:-

प्राथमिक शाळांमधील ग्रंथालये ही त्या स्तरावरील शालेय अभ्यासक्रमाचा एक अविभाज्य घटक म्हणून कार्य करीत असतात. तर माध्यमिक शाळांची ग्रंथालये आपले स्वतंत्र अस्तित्व ठेऊन तरूण विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या शिक्षकांना आवश्यक असणारे संदर्भ व माहिती पुरवित असतात. शिक्षणाच्या स्तरावर शालेय ग्रंथालये तीन पातळयांवर शैक्षणिक कार्याला सहाय्य करीत असतात. जसे प्राथमिक वर्ग वय वर्ष ६ते ८ माध्यमिक वर्ग वय वर्ष ९ ते १0 आणि उच्च माध्यमिक वर्ग ११ ते १२ हा एकुण सात वर्षांचा कालावधी असतो. ही वर्षे म्हणजे विद्यार्थ्यांच्यादृष्टीने अत्यंत संवेदनशील असा कालखंड असतो आणि या या काळात त्यांच्यावर होणारे संस्कार हे चिरस्थायी असतात. एका दृष्टीने त्यांच्या व्यक्तिमत्वाची पायाभरणीच या कालखंडात होत असते. त्यामुळे शालेय ग्रंथालये विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत विधायक भूमिका बजावू शकतात.

विद्यार्थ्यांना शाळेतील ग्रंथालयाचा उपयोग करून घेण्याची सवय लावणे व ही कृती फक्त अभ्यासापुरतीच मर्यादित न ठेवता आनंदासाठी, माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी किंवा करमणूक म्हणूनही वाचन करावे अशी सवय विद्यार्थ्यांमध्ये जोपासली पाहिजे.

एखादया विवक्षित विषयावरील संदर्भ व माहिती ग्रंथालयातील पुस्तके व नियतकालिके वाचून त्यामधून माहिती जमविण्याचे कौशल्य विकसित करण्याचे कार्य ग्रंथालय करू शकते.

आपल्या शाळेतील ग्रंथालयाव्यतिरिक्त शहरातील इतर शैक्षणिक, सार्वजनिक अथवा विशेष ग्रंथालयांना भेटी देऊन माहिती मिळविण्याची संधी विद्यार्थ्यांना देण्यात येते. त्यायोगे देशातील ग्रंथालय पद्धतीचा परिचय मुलांना होऊ शकतो. विविध प्रकारच्या ग्रंथालयांची वैशिष्टे त्यांना समजू शकतात. याचा त्यांना भावी जीवनात उपयोग होऊ शकतो.

**२. ८ माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह ...**

माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्या अध्ययन व अध्यापनविषयक गरजा विचारात घेऊन त्यास पूरक व सहायक होईल असा प्रकारची पुस्तके व अन्य साधने यांचा संग्रह करणे ही या ग्रंथालयांची प्राथमिक जबाबदारी आहे. यादृष्टिने काही मार्गदर्शक बाबी पुढीलप्रमाणे.... .

१. शिक्षण मंडळ किंवा बोर्डाने शिफारस केलेली कमिक व संदर्भ पुस्तके आवश्यक तेवढया संख्येने घेणे.

२. हुशार विद्यार्थी व शिक्षक यांच्याकरिता अधिक प्रगत स्वरूपाची पुस्तकेसुद्धा ग्रंथालयात असावीत.

३. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी या दृष्टीने विविध विषयावरील वाचनीय पुस्तके उदा. थोरांची चरित्रे, क्रिडा, प्रवासवर्णने, विविध भूप्रदेशांचे नकाशे इ. साहित्याची खरेदी करावी.

४. कथासंग्रह कादंबरी असी ललितसाहित्याची पुस्तकेही ग्रंथालयात अवश्य घेण्यात यावीत.

५ . काही संदर्भग्रंथ माध्यमिक विद्यालयाच्या ग्रंथालयात अवश्य असले पाहिजे जसे...

खास मुलांसाठी प्रकाशित केलेले विश्वकोश, सचित्र शब्दकोश सर्वसामन्य व तांत्रिक विषयावरील शब्दकोश, विविध विषयावरील वार्षिके नकाशासंग्रह इ. त्याचप्रमाणे विविध संदर्भ पुस्तके, सामान्य ज्ञान देणारे इतर संदर्भग्रंथ, लोकप्रिय तसेच वैचारिक अशा दोन्ही प्रकारची नियतकालिके, दृकश्राव्य वाचन साहित्य, याशिवाय शास्त्रज्ञ किंवा साहित्यिक यांच्या चित्रांचे संग्रह, निसर्गाची सचित्र माहिती देणारे संदर्भग्रंथ, वृत्तपत्रीय कात्रणे तसेच जुनी किंवा परदेशी नाणी यांचा संग्रह माध्यमिक विद्यालयाच्या ग्रंथालयात असावा.

पुणे येथील नूतन मराठी विद्यालयाच्या ग्रंथालयाने केलेला ग्रंथसंग्रह अथवा पुण्याच्याच रेणुकास्वरूप मेमोरिअल विद्यामंदिर शाळेच्या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

या साहित्याची निवड ही शाळेच्या ग्रंथनिवड धोरणानुसार काळजीपूर्वक केलेली असावी. त्यात व्यवस्थापक मंडळी, शिक्षकवर्ग आणि ग्रंथालयीन कर्मचारी या सर्वांच्या विचारांचे प्रतिबिंब पडलेले असावे. त्याचबरोबर या धोरणांच्या अंमलबजावणीत ग्रंथपाल व त्यांचे सहकारी यांना प्रचलित नियमांनुसार पुरेसे स्वातंत्र्य असावे त्यात कोणाही इतर घटकांचा अवास्तव हस्तक्षेप होऊ नये याची दक्षता शाळा प्रमुख अथवा व्यवस्थापनाने घेतली पाहिजे.

## २ . ९ माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवाः

माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयातून सामन्यपणे पुढील सेवा दिल्या जातात...

- पुस्तकांची देवघेव
- माहिती व संदर्भ पुरविणे
- ग्रंथालयाचा योग्य रीतीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन व सल्ला देणे
- विशिष्ट विषयावरील वाचनसाहित्याची सूची गरजेनुसार तयार करणे
- प्रचलित घटना घडामोडी, प्रकाशातील व्यक्ति, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय महत्वाचे प्रसंग, विज्ञान क्षेत्रातील नवे संशोधन इत्यादी संदर्भातील माहिती वाचकांना पुरविणे .

ग्रंथप्रसार वाचनप्रवृत्तीची जोपासना सांस्कृतिक मुल्यांचे संवर्धन या दृष्टिने काही विशेष उपक्रम राबविणे जसे...

- ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करणे
- महत्वाच्या पुस्तकांवर मान्यवरांच्या उपस्थितीत चर्चासत्रांचे आयोजन करणे .
- विद्यार्थ्यांसाठी निबंध वक्तृत्व इत्यादी स्वरूपाच्या स्पर्धा आयोजित करणे .
- नवीन आलेल्या पुस्तकांची मुखपृष्ठे व जाहिराती प्रदर्शित करणे .
- वाचकांच्या उदबोधनासाठी वृत्तपत्रीय कात्रणे, लेख, घोषणा, निवेदने इत्यादींची प्रसिद्धी करणे . इत्यादी .

माध्यमिक विद्यालयातील ग्रंथालये आपल्या विद्यार्थी व वाचकांसाठी ज्या सोयी पुरवीत असतात त्यासंबंधी असे म्हणता येईल की

पुस्तकांची देवघेव ही प्रमुख आणि महत्वपूर्ण सुविधा आहे याद्वारे विद्यार्थी आपल्या अभ्यासासाठी अथवा अधिक वाचनासाठी लागणारी पुस्तके ठराविक दिवसांसाठी घरी घेऊन जाऊ शकतात. अशाप्रकारे ग्रंथालयातील पुस्तकांचा जास्तीत जास्त वापर करावा यासाठी त्यांना सतत उत्तेजन दिले पाहिजे.

चालू घडामोडींचे ज्ञान विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना करून देण्याच्या हेतूने महत्वाच्या बातम्यांची कात्रणे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींची छायाचित्रे प्रसंगानुरूप विद्यार्थ्यांपुढे ठेवणे, बोधप्रद वा माहितीपूर्ण लेखांची कात्रणे फलकांवर प्रदर्शित करणे इत्यादी कामांचा समावेश होतो. या माहितीच्या वाचनाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते.

### २. १0 माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयामध्ये ग्रंथपालाचा सहभाग/ महत्व स्थान

विद्यालयातील ग्रंथसंग्रहाचा योग्य प्रकारे विकास करण्यासाठी जे व्यावसायिक कौशल्य अपेक्षित असते त्यात सामान्यतः पुढील गोष्टींचा समावेश होऊ शकतो.

शाळेत शिकविल्या जाणाऱ्या प्रत्येक विषयाची प्राथमिक व सर्वसामान्य ज्ञान ग्रंथपालास असले पाहिजे. ग्रंथपालास ग्रंथनिवड प्रक्रियेची चांगली माहिती असावी. तसेच ग्रंथनिवड करण्यास सहायक अशा गोष्टीची जसे ग्रंथसूची, वृत्तपत्रातील ग्रंथपरिक्षणे, नवीन प्रकाशनांची माहिती पुरविणारी नियतकालिके इत्यादी सम्यकज्ञान ग्रंथपालास असावे. ग्रंथपालाचे ज्ञान चौफेर असेल तर त्याला प्रकाशन विश्वाची चांगली माहिती असू शकते.

ग्रंथपालास इतर शैक्षणिक साहित्याची व दृकश्राव्य साधनांचीही चांगली माहिती असावी . सामान्यतः ग्रंथपालांना पुस्तकांची माहिती असते परंतु अनेकदा ते स्लाईड प्रोजेक्टर, टेप्स, मॉडेल्स यासारख्या तांत्रिक साधनांच्या वापराबाबत अनभिज्ञ असतात. अशावेळी त्यांना इतरांवर अवलंबून राहवे लागते. हे टाळण्यासाठी ग्रंथपालानी स्वताला सारे यायला हवे या भूमिकेतून या सर्व वाचनसाहित्याच्या वापराची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

ग्रंथपालाना आपल्या शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांच्या शैक्षणिक गरजांचे आकलन झालेले असावे. या सर्व घटकांचे समाधान करता येईल असा ग्रंथसंग्रह ग्रंथपालाने संग्रहित केलेला असावा. ग्रंथालयातून दिली जाणारी सेवा ही प्रामुख्याने तेथील सेवकवर्गाच्या सेवाभावी वृत्तीवर व कार्यकुशलतेवर अवलंबून असते. त्यामुळे या ग्रंथालयांचा ग्रंथपाल शैक्षणिकदृष्टया अपेक्षिता गुणवत्ता असलेला तसेच शैक्षणिकदृष्टयाही प्रशिक्षित असावा. प्रशासनिक कौशल्यही त्याच्याकडे असलेच पाहिजे. ग्रंथपालास सहाय्य करणारा इतर कर्मचारी वर्गही त्या त्या पदास आवश्यक पात्रता धारण केलेला असावा.

## २.११ शालेय ग्रंथालयांची सद्य:स्थिती:-

आपल्या देशातील शालेय ग्रंथालयांच्या विकासाचा विचार केला की जाणवते की येथील शासनाने, शिक्षणतज्ज्ञांनी आणि ग्रंथालय संघटनांनीसुद्धा शालेय ग्रंथालयाच्या प्रगतीकाडे लक्ष दिलेले दिसत नाही. त्यांनी शालेय ग्रंथालयाचे शैक्षणिक महत्त्व लक्षातच घेतलेले नाही. इंग्लंड, अमेरिकेसारख्या प्रगत देशातील शालेय ग्रंथालयांचा इतिहास वाचला की जाणवते की तेथील शासनानांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनी शालेय ग्रंथालये सुधारण्यासाठी अविरत प्रयत्न केले

आणि त्यामुळे त्या देशात चांगली शालेय ग्रंथालये अस्तित्वात आली. आज ती ग्रंथालये तेथील शालेय विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाच्या प्रयोगशाळा बनल्या आहेत.

आपल्या देशातील शालेय ग्रंथालयाची आजची स्थिती पाहता असे जाणवते की बहुसंख्य शाळांतील ग्रंथालये अजूनही उपेक्षित आणि दुर्लक्षितच राहिली आहेत. केंद्र शासनाने देशातील माध्यमिक शिक्षणाची सर्वांगीण पाहणी करून शासनाला सल्ला देण्यासाठी १९५२ साली डॉ. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली 'माध्यमिक शिक्षण आयोग' नेमला होता.

माध्यमिक शिक्षण आयोगाने कितीतरी वर्षापूर्वी शालेय ग्रंथालयाचे जे चित्र पाहिले होते त्या चित्रामध्ये अजूनही फारसा फरक पडलेला नाही. शालेय ग्रंथालयांची स्थिती सुधरावी म्हणून शासन अजूनही फारसे प्रयत्न करित नाही त्यामुळे राज्यातील शालेय ग्रंथालये दुर्लक्षितच राहिली आहेत. शासनाच्या उदासिन वृत्तीमुळे बहुसंख्य शाळांतील ग्रंथालयांची स्थिती फारसी उत्साहजनक नाही.मात्र ज्या काही थोडया संस्थाचालकांना आणि मुख्याध्यापकाना शालेय ग्रंथालयाचे महत्त्व कळाले त्यांच्या शाळांतून चांगली ग्रंथालये आढळतात.

## २. १२ शालेय ग्रंथालयासंदर्भात राज्य शासनाची जबाबदारी:-

नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (NCERT)ने १९९२ साली केलेल्या पाहणीत असे आढळून आले आहे की आपल्या देशातील शालेय ग्रंथालयांकडे शासनाने जेवढे लक्ष द्यायला हवे तेवढे दिले जात नाही.

देशातील त्यावेळच्या एकुण ७,३५,७७१ शाळांपैकी फक्त २९३४२७ म्हणजे ३९. ८८ टक्के शाळांमध्ये ग्रंथालये आहेत.

या ३९. ८८ टक्के शालेय ग्रंथालयांपैकी काही ग्रंथालयात १00 पेक्षाही कमी ग्रंथ असल्याचे आढळून आले होते.

देशातील शालेय ग्रंथालयाच्या आजच्या या स्थितीस राज्य शासनाची त्यांच्याकडे पाहण्याची उदासिन वृत्तीच कारणीभूत आहे. या वृत्तीचा त्याग करून शालेय शिक्षणात शालेय ग्रंथालयांना महत्त्वाची कामगिरी पार पाडता येते आणि शालेय ग्रंथालयाची उद्दिष्ते शाळेच्या उद्दिष्तांइतकीच महत्त्वाची आहेत हे ध्यानात घेऊन शासनाने शालेय ग्रंथालयाची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करावयास हवेत. शालेय ग्रंथालयांच्या नेमक्या कोणत्या समस्या आहेत कोणत्या अडचणी आहेत हे कळावे म्हणून राज्यशासनाने राज्यातील माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांची पाहणी करायला हवी. या पाहणीतून उपलब्ध झालेल्या माहितीवरून शालेय ग्रंथालयांसाठी नेमके निर्णय घेता येतील. राज्यातील शाळांत चांगली ग्रंथालये सुरू करता यावीत व त्यांची व्यवस्थित वाढ व्हावी म्हणून राज्य शासनाने शिक्षण संचालनालयात एक वेगळा ग्रंथालय विभाग निर्माण करून राज्य शालेय ग्रंथालयाधिकाऱ्याची नेमणूक करावी.

## २. १३ शालेय ग्रंथालयासंदर्भात केंद्र शासनाची जबाबदारी:-

राष्ट्राच्या ग्रंथालय पद्धतीत शालेय ग्रंथालयांना कमी लेखून चालणार नाही. देशातील माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी ग्रंथालये बऱ्याच अंशी कारणीभूत होतात हे लक्षात घेऊन आपल्या राष्ट्रीय सरकारने देशातील माध्यमिक शाळांतील ग्रंथालये

सुधारण्याकडे लक्ष द्यायला हवे. केंद्र सरकार आज शैक्षणिक ग्रथालयांपैकी महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांकडे लक्ष देत आहे त्यांना विशेष सुविधा, पुरेसे आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देत आहे. शैक्षणिकदृष्टया ही समाधानाची गोष्ट आहे परंतु हेच धोरण केंद्रशासन माध्यमिक शाळांतील ग्रंथालयाच्या बाबतीत अवलंबीत नाही याबद्दल विषाद वाटतो. माध्यमिक शिक्षण ही केवळ राज्य शासनाची जबाबदारी नसून ती केंद्र शासनाचीही आहे ही गोष्ट केंद्र शासनानेच नेमलेल्या कोठारी आयोगाने आपल्या अहवालात स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयांच्या विकासासाठी प्रयत्न करायला पाहिजेत.

## २. १४ माध्यमिक शाळांच्या विकासासाठी मुदलियार आयोगाची कार्ये

१. मुदलियार आयोगाची शिफारस (१९५२-५३)

माध्यमिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी डॉ.मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला होता. इ. स. १९५३ मध्ये या आयोगाने आपला अहवाल सादर केला. त्यातील प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे:

**माध्यमिक शिक्षणाची संघटनात्मक रचना** ः. चार वर्षे/पाच वर्षे प्राथमिक मूलोद्योगी शिक्षण +३ वर्षे माध्यमिक शिक्षण +उच्च माध्यमिक शिक्षण +३ वर्षाचा प्रथम पदवी अभ्यासक्रम.

बहुउद्देशीय शाळा, शेतकी शिक्षणाची सोय, तंत्रविषयक शाळा, अपंगांसाठी शाळा, मुलींसाठी अभ्याक्रम, इत्यादी विविध विषयांवर मुदलियार आयोगाने शिफारशी केल्या आहेत.

**ग्रंथालयासंदर्भात मुदलियार आयोगाच्या शिफारशी:-**

देशातील माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शालेय ग्रंथालयाची फार आवश्यकता आहे असे आग्रही प्रतिपादन आयोगाने आपल्या आयोगात केले आहे. या अहवालातील **'माध्यमिक शिक्षणात ग्रंथालयाचे स्थान'** या स्वतंत्र प्रकरणात शालेय ग्रंथालयासंबंधी महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे:

१. माध्यमिक शाळांतून ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देणे ही एक शैक्षणिक गरज आहे. माध्यमिक शाळांमध्ये कार्यक्षम ग्रंथालये असल्याशिवाय त्यांना आपली शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करता येत नाहीत. त्यामुळे शाळांमध्ये समृद्ध ग्रंथालय आणि प्रशस्त क्रिडांगण असावे.

२. शाळांमधून दिले जाणारे शिक्षण ग्रंथालयाधारित असावे. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्यासाठी शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन करावे.

३. ग्रंथालयाची जागा पुरेशी व विद्यार्थ्यांना आकर्षित करून घेईल असी असावी. ग्रंथालयातील वातावरण प्रसन्न असावे.

४. शालेय ग्रंथालयाचे संघटन आणि व्यवस्थापन योग्य प्रकारे करता येण्यासाठी आवश्यक अर्थसहाय्य शासनाने उपलब्ध करून दिले पाहिजे.

५. राज्य शासनाच्या शिक्षणखात्याने शालेय ग्रंथालयासाठी लागणाऱ्या जागा, आर्थिक सहाय्य, ग्रंथालय कर्मचारी इत्यादी सुविधासंबंधीचे प्रमाण ठरवून दिली पाहिजे.

६. शालेय ग्रंथालयाचा वापर योग्य प्रकारे केला जात आहे किंवा नाही हे शाळा तपासनीकाने दरवर्षी पाहिले पाहिजे आणि आपल्या वार्षिक अहवालात त्या संबंधीची अवलोकने नोंदविली पाहिजेत.

माध्यमिक शिक्षण आयोगाने माध्यमिक शाळांतील ग्रंथालयासंबंधी केलेल्या या महत्वपूर्ण शिफारशी शासनाने स्वीकारून त्या प्रत्यक्षात आणल्या तर राज्यातील शालेय ग्रंथालयांची स्थिती निश्चितच सुधारेल.

## २.१५ नवे शैक्षणिक धोरण आणि शालेय ग्रंथालये:

राज्याच्या नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर आणि शिक्षण अधिकाधिक व्यवसायाभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास व्हावा या उद्देशाने शाळांतून सामान्य ज्ञान हा विषय सक्तीचा केला आहे. आधुनिक काळात सामान्य ज्ञानाचे स्वरूप एवढे व्यापक झाले आहे की, तो विषय पाठयपुस्तकांत किंवा वेळापत्रकाच्या चौकटित बसविणे शक्य नाही. हा विषय काल परिस्थिती सापेक्ष असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील शंका, कुतूहल, जिज्ञासा शमविण्यासाठी त्यांना ग्रंथालयातून अत्याधुनिक माहिती उपलब्ध करून दयावी लागते. प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना हवी असलेली माहिती देण्याचे काम विषय शिक्षक करू शकला तरच ख-या अर्थाने सामान्य ज्ञान मिळू शकेल. शिक्षकाला हे अध्यापनाचे काम योग्य प्रकारे करता यावे म्हणून शाळेत समृद्ध ग्रंथालय आणि शिक्षकांना साथ देणारा जाणकार ग्रंथपाल असायला हवा. नवीन अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांप्रमाणे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी अध्ययन - अध्यापानात अनेकविध माध्यमांचा वापर झाला पाहिजे. ग्रंथालय साहित्य आता केवळ मुद्रित साहित्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. नवीन अभ्यासक्रमात अपेक्षित असलेले चांगले शैक्षणिक उपक्रम शाळांतून राबविण्यासाठी शालेय ग्रंथालयातून सर्व प्रकारची अध्यापन साधने शाळांनी उपलब्ध करून द्यायला हवीत.

शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट साध्य करता यावे म्हणून शाळेत सर्व प्रकारच्या ज्ञानसाधनांनी समृद्ध असलेले ग्रंथालय असायला हवे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून ती वाढीला लावण्यासाठी त्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची आणि स्व शिक्षणाची सवय लावण्यासाठी आणि नवीन अभ्यासक्रमात शिक्षकांना जी भूमिका पार पाडावयाची आहे त्यासाठी शाळेत मध्यवर्ती ग्रंथालय असणे अगदी आवश्यक आहे. नवीन अभ्यासक्रमात अभिप्रेत असलेली विद्यार्थ्यांची बौद्धिक तयारी लक्षात घेतली तर शालेय वेळापत्रकात ग्रंथालय तास हवा, ग्रंथालयात 'मुक्त प्रवेश पद्धती' असावी आणि ग्रंथालय अधिक वेळ उघडे ठेवावयास हवे.

शिक्षणाच्या चाकोरीबद्ध चौकटित पाठीवर दप्तराचे ओझे तर मनावर निरर्थक पाठांतराचे दडपण आणि त्या जोडीला जीवघेण्या स्पर्धेचा ताप. अशा या विचित्र कोंडीमध्ये आजचा शालेय विद्यार्थी अडकला आहे. अशा परिस्थितीतून विद्यार्थ्यांची सुटका करून त्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे अशी शासनाची धारणा आहे. म्हणूनच शासनाने नवीन अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे. हा अभ्यासक्रम जर योग्य तऱ्हेने राबविला तर विद्यार्थी शालेय जीवनातच व्यवसाभिमुख शिक्षणाचा प्रारंभ करू शकतील.

अश्या चांगल्या दर्जाचे शिक्षण शाळांतून देण्यासाठी व्यासंगी शिक्षकांची जेवढी गरज आहे तेवढीच असे शिक्षक तयार करण्यासाठी शाळेत ग्रंथालयाची गरज आहे. हे शालेय ग्रंथालय विपुल ग्रंथसंपदेने समृद्ध असावे तेथे शिक्षकांना शांतचित्ताने वाचता येईल अशी सोय असावी. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा वापर अगदी मोकळेपणाने करता यावा आणि महत्त्वाचे म्हणजे या दोघांनाही प्रतिसाद देणारा, त्यांची जिज्ञासा तृप्त करणारा आणि ज्ञानाचे दालन त्यांना मोठया प्रेमाने खुले करून देणारा सेवकवर्ग ग्रंथालयात असावा.

तेव्हाच शासनाच्या अपेक्षेप्रमाणे पुढच्या आयुष्यात यशस्वीपणाने वाटचाल करणारे विद्यार्थी तयार होतील.

## २.१६ माध्यमिक शिक्षक

समाजामध्ये अनेक व्यवसाय असतात. प्रत्येक व्यवसाय आपल्या ठिकाणी महत्वाचा असतो. किंबहुना असे म्हणता येईल की कोणताही व्यवसाय श्रेष्ठ वा कनिष्ठ नसतो. भौतिक गरजा वेगवेगळया व्यवसायांद्वारे भागविल्या जातात. त्या व्यवसायाबद्दल सर्वांनी कृतज्ञ राहायला पाहिजे. या सर्वांपलीकडे जाऊन व्यक्तीचे जीवन समृद्ध, संपन्न करणारी, समाज जीवनाचा स्तर उंचाविणारी, वैयक्तिक जीवनाची आत्मिक मानसिक समृद्धी करणारी अशी काही मूल्ये असतात त्यांचा विकास करणारा व मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक गरजा भागविणारा जो व्यवसाय असतो त्याला समाजात श्रेष्ठ व मानाचे स्थान असते याबाबत शंकाच नाही. शिक्षण हा असाच एक व्यवसाय आहे. व्यक्तिच्या शारिरीक, भावनिक, नैतिक विकासाचा पाया शिक्षणामुळेच घातला जातो. मानवी जीवनातील व कोणत्याही क्षेत्रातील प्रगतीचे केंद्र शिक्षण आहे. आणि या सर्वांचे दुसरे चाक शिक्षक आहे. शिक्षण व्यवसाय हा अत्यंत पवित्र व उदात्त असा व्यवसाय आहे. व्यक्तिंना सुसंस्कारित करण्याचे, त्यांचे चारित्र्य घडविण्याचे, व्यक्तिला पशुत्वाकडून मनुष्यत्वाकडे नेण्याचे काम शिक्षकाला करावे लागते. त्यामुळे शिक्षणाच्या संपूर्ण प्रकियेत शिक्षकाला अतिशय महत्वाचे स्थान आहे.

## २.१७ आजच्या शिक्षकाची गुणवत्ता व नीतिमत्ता

आजच्या शिक्षकाची गुणवत्ता व नीतिमत्ता यांबाबत शं. कृ. सोहनी यांनी म्हटले आहे की "शिकविणारा तो शिक्षक ही साधी व्याख्या आहे. शिकविण्याचे आता शास्त्र झाले आहे. पण ती एक कलाही आहे. शिक्षक हा जन्मावाच लागतो तो घडविणे कठिण आहे. शिक्षकाचे काम, कौशल्य यांचा जसा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात उपयोग होतो त्याचप्रमाणे त्याचे चारित्र्य, स्वभाव यांचा मुलांच्या मनावर जबरदस्त परिणाम होत असतो. म्हणून विषयाची तयारी, शिकविण्याची हातोटी, विद्यार्थ्यांबद्दल कळकळ, मुलांच्या विकासात लक्ष या गुणांबरेबरच मुलांवर संस्कार करण्याची क्षमता शिक्षकांमध्ये असली पाहिजे."

कविवर्य रवींद्रनाथ टागोरांनी शिक्षक कसा असावा यासंबंधी आपले विचार पुढीलप्रमाणे सांगितले आहेत "मुलांना शिकविण्यासाठी त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी अपार सहानुभूती, सखोल जाणीव व विशाल कल्पनाशक्तीची आवश्यकता आहे. म्हणून ज्याच्या अंगी असी सहानुभूती व कल्पनाशक्ती नसेल त्यांच्यावर मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी कदापि टाकता कामा नये."

अशाप्रकारे अनेक तत्त्ववेत्यांनी व विचारवंतानी शिक्षकाच्या गुणवत्तेबाबत विचार मांडले आहेत. म्हणून विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात शिक्षकांस अनन्यसाधारण महत्त्व आहे.

एखादया व्यक्तीने कोणती पुस्तके वाचली आहेत त्यावरून त्याच्या विद्वतेची कल्पना येते. म्हणून शालेय शिक्षक ग्रंथालयाचा कितपत वापर करतात व विद्यार्थ्यांना त्याचा काय उपयोग होऊ शकतो याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

म्हणून संशोधकाने **माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाच्या वापराचा अभ्यास** करण्याचे ठरविले आहे.

संदर्भसूची :-

१ . दुनाखे,अरविंद . (२००५) *भारतीय शिक्षणपद्धती व माध्यमिक शिक्षण.* पुणे: नूतन प्रकाशन . पृ . १२० .

२ . देशपांडे, ए . व्ही . (२००४) *ग्रंथालयांचे विविध प्रकार व त्यांची कार्ये.* नाशिक: य . च . म . मुक्त विद्यापीठ . पृ . ६-९

३ . वास्कर, आनंद . (२००६) . *माध्यमिक शिक्षण आणि शालेय व्यवस्थापन.* नाशिक: याज्ञी प्रकाशन . पृ . ४८ .

४ . शिवणेकर ल . मा . (१९९८) . *माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपद्धती.* पुणे: विद्यार्थी गृह प्रकाशन . पृ . १४

५ . सावे, वसंत . (२००८) . *शालेय ग्रंथालये.* नाशिक: य . च . म . मुक्त विद्यापीठ . पृ . ६/ २६-२९ .

६ . Agbo, A. D. (2003).School Libraries and Development of Library skills in Nigerian Secondary Education system" (*Ph. D.Thesis)* Department of Education, Bangalore University, Bangalore.

# प्रकरण तिसरे

# पंढरपूर शहर आणि पंढरपूर शहरातील शाळा

### ३.१ पंढरपूरची थोडक्यात माहितीः

भारतातील महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयात भिमानदीच्या तीरावर पंढरपूर हे प्राचीन शहर वसलेले आहे. भीमा नदीला भिवरादेखील म्हणतात. ही नदी येथे अर्धचंद्राकार वाहते म्हणून तिला चंद्रभागा हे नाव आहे. वारक-यांचेच नव्हे तर अनेक वैष्णव संप्रदायांचे केवळ महाराष्टीयांचेच नव्हे तर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, उत्तरप्रदेश,मध्यप्रदेशादि अनेक प्रांतातील अनेक लोकांचे अनेकविधभाषिकांचे परमात्मा पंढरीनाथ हे अराध्य दैवत आहे. अनेक संतांनी या देवाचे महात्म्य गाइलेले आहे.

सर्व क्षेत्रात वरीष्ठ क्षेत्र पंढरी, सर्व तीर्थात वरीष्ठ तीर्थ चंद्रभागा, सर्व देवात वरीष्ठ देव श्री विठ्ठल व सर्व भक्तांमध्ये श्रेष्ठ भक्त श्रीपुंडलिक हा आहे.

# ३.२ पंढरपूर शहरातील शाळा

| अ.न. | शाळेचे नाव | शाळेचा प्रकार |
|---|---|---|
| १ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | माध्यमिक शाळा |
| २ | अभिजित इंग्लिश मिडियम स्कूल पंढरपूर | प्राथमिक शाळा |
| ३ | आदर्श बालक मंदिर | प्राथमिक शाळा |
| ४ | आदर्श प्रायमरी स्कूल | प्राथमिक शाळा |
| ५ | अजितदादा पवार विद्यालय | प्राथमिक शाळा |
| ६ | आपटे प्रशाला | माध्यमिक शाळा |
| ७ | अविनाश विद्यालय | प्राथमिक शाळा |
| ८ | बालविकास प्रायमरी विद्यालय | प्राथमिक शाळा |
| ९ | द.ह. कवठेकर प्रशाला | माध्यमिक शाळा |
| १0 | इंग्लिश मिडियम स्कूल, | माध्यमिक शाळा |
| ११ | कवठेकर प्रशाला | माध्यमिक शाळा |
| १२ | लिटिल बर्ड इंग्लिश मिडियम स्कूल | प्राथमिक शाळा |
| १३ | लोकमान्य विद्यालय | माध्यमिक शाळा |
| १४ | मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला | माध्यमिक शाळा |
| १५ | माध्यमिक आश्रम स्कूल | माध्यमिक शाळा |
| १६ | मातृ मंदिर | प्राथमिक शाळा |
| १७ | प्रोग्रस इंग्लिश स्कूल | प्राथमिक शाळा |
| १८ | राजाराम इंग्लिश स्कूल | प्राथमिक शाळा |

| | | |
|---|---|---|
| १९ | राजाराम विद्यालय | माध्यमिक शाळा |
| २० | राजीव गांधी प्रायमरी स्कूल | प्राथमिक शाळा |
| २१ | रूक्मिणी विद्यालय | माध्यमिक शाळा |
| २२ | विवेक वर्धिनी विद्यालय , | माध्यमिक शाळा |
| २३ | यशवंत विद्यालय | माध्यमिक शाळा |

पंढरपूर शहरामध्ये एकुण २३ शाळा आहेत. त्यापैकी ११ प्राथमिक शाळा आहेत.११ माध्यमिक शाळा आहेत तर, १ आश्रमशाळा आहे.

३.३ संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या शाळा

| अ.न. | शाळेचे नाव | शाळेचा पत्ता | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| १ | आपटे प्रशाला | जुन्या नगरपालिकेसमोर,पंढरपूर | १९१४ |
| २ | कवठेकर प्रशाला, | नाथचौक, पंढरपूर | १९४७ |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला, | वीर सावरकर पथ, पंढरपूर | १९६८ |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय , | काळा मारूती चौक,संतपेठ, पंढरपूर | १९७५ |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल, | मनिषा नगर,भाळवणी रोड पंढरपूर | १९७५ |
| ६ | लोकमान्य विद्यालय | म्युनिसिपल कौन्सिल,मेन बिल्डिंग समोर, पंढरपूर | १९८७ |
| ७ | यशवंत विद्यालय | लिंकरोड,के.बी.पी.कॉलेजच्या शेजारी,पंढरपूर | १९९0 |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | टाकळी रोड,पंढरपूर | १९९४ |
| ९ | मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला | सावरकर रोड ,बडोदा बॅंकेसमोर, पंढरपूर | १९९५ |
| १0 | राजाराम विद्यालय | तनपुरे महाराज मठाशेजारी,पंढरपूर | १९९८ |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | पुंडलिक नगर,पंढरपूर | २00१ |

संशोधकाने संशोधनासाठी घेतलेल्या ११ माध्यमिक शाळांची प्राथमिक माहिती संकलित केली आहे ती पुढीलप्रमाणे...

### ३.३.१ आपटे प्रशाला, पंढरपूर

आपटे प्रशाला पंढरपूर, ही पंढरपूर शहरातील सर्वात जुनी शाळा म्हणून ओळखली जाते. या शाळेची स्थापना १९१४ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे. हि खाजगी अनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रक्रिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गांची एकुण विद्यार्थी संख्या ८१0 असून एकुण शिक्षक संख्या ३८ आहे .शाळेमध्ये सुसज्ज ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण १६२६८ पुस्तके उपलब्ध आहेत. या शाळेच्या ग्रंथालयाचे मुख्य वैशिष्टय म्हणजे शाळेच्या मुख्य इमारतीच्या अगदी मध्यावर ग्रंथालयाचे स्थान ठेवले आहे. ज्यामुळे सर्व ठिकाणांहून ग्रंथालयात जाणे सोयीचे पडते.

शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंम्मेलनाचे तसेच इतर प्रसंगानुरूप सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यासंबंधीची माहिती शाळेच्या विद्यार्थ्यांशी साधलेल्या संवादातून प्राप्त झाली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट , बास्केटबॉल इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

३.३.२ कवठेकर प्रशाला, पंढरपूर

कवठेकर प्रशाला  पंढरपूर, या शाळेची स्थापना १९४७ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे.ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे.हि खाजगी अनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गाची एकुण विद्यार्थी संख्या ९८५ आणि एकुण शिक्षक संख्या ३१ आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण १४१९0 एवढी पुस्तके उपलब्ध आहेत.

कवठेकर प्रशाला पंढरपूर या शाळेच्या ग्रंथालयामध्ये ग्रंथपालाने एक उपक्रम राबविला आहे तो म्हणजे ज्या विद्यार्थ्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्या विद्यार्थ्यांच्या वाढदिवसादिनी ग्रंथालयासाठी एखादे पुस्तक भेट म्हणून स्विकारणे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वागीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी किकेट,  बास्केटबॉल, हॉलीबॉल ,टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.३ द.ह.कवठेकर प्रशाला, पंढरपूर

द.ह.कवठेकर प्रशाला पंढरपूर, या शाळेची स्थापना १९६७ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे.हि खाजगी अनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची एकुण विद्यार्थी संख्या ११७७ आहे.एकुण शिक्षक संख्या ४७ आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण २०९४२ पुस्तके उपलब्ध आहेत.

शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंम्मेलनाचे तसेच इतर प्रसंगानुरूप सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.यासंबंधीची माहिती शाळेच्या विद्यार्थ्यांशी साधलेल्या संवादातून प्राप्त झाली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी किकेट , बास्केटबॉल, हॉलीबॉल, टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.४ विवेक वर्धिनी विद्यालय, पंढरपूर

विवेक वर्धिणी विद्यालय पंढरपूर, या शाळेची स्थापना १९७५ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे.हि खाजगी अनुदानित शाळा आहे.शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गांची एकुण विद्यार्थी संख्या ५२३ आहे. एकुण शिक्षक संख्या २१ आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ८७६८इतकी पुस्तके उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे.शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट, बास्केटबॉल, टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.५ इंग्लिश मिडियम स्कूल, पंढरपूर

इंग्लिश मिडियम स्कूल पंढरपूर, या शाळेची स्थापना १९७५ साली झाली आहे. हि इंग्रजी माध्यम शाळा आहे.ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे.हि खाजगी विनाअनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची आठवी ते दहावी एकुण विद्यार्थी संख्या ४५0 एकुण शिक्षक संख्या ३२ आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ५0७५ इतकी पुस्तके उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वागीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट , बास्केटबॉल, इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.६ लोकमान्य विद्यालय, पंढरपूर

लोकमान्य विद्यालय पंढरपूर, या शाळेची स्थापना १९८७ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे.हि खाजगी विनाअनुदानित शाळा आहे.शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची एकुण विद्यार्थी संख्या ५४८ असून एकुण शिक्षक संख्या ३४ आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ५०४० पुस्तके उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वागीण विकासात शाळेचे योगदान आहे.शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट , बास्केटबॉल, हॉलीबॉल टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.७ यशवंत विद्यालय, पंढरपूर

यशवंत विद्यालय पंढरपूर, या शाळेची स्थापना १९९0 साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे. हि खाजगी विनाअनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी एप्रिल महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गाची एकुण विद्यार्थी संख्या ४७५ आहे. एकुण शिक्षक संख्या २३ आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ६७६८ पुस्तके उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट, हॉलीबॉल इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.८ अण्णा भाऊ साठे विद्यालय, पंढरपूर

अण्णा भाऊ साठे विद्यालय पंढरपूर या शाळेची स्थापना १९९४ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे.हि खाजगी अनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रक्रिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गाची एकुण विद्यार्थी संख्या ४५0 आहे. एकुण शिक्षक संख्या २0 आहे.शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ११६१0 इतकी पुस्तके उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.९ मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला, पंढरपूर

मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला पंढरपूर, या शाळेची स्थापना १९९५ साली झाली आहे. हि मराठी माध्यम आणि फक्त मुलींसाठी शाळा आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे. हि खाजगी विनाअनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रक्रिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गांची एकुण विद्यार्थी संख्या २१५ आहे. एकुण शिक्षक संख्या १४आहे. शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ६९४४ इतकी पुस्तके उपलब्ध आहेत.

शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंम्मेलनाचे तसेच इतर प्रसंगानुरूप सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यासंबंधीची माहिती शाळेच्या विद्यार्थ्यांशी साधलेल्या संवादातून प्राप्त झाली.

विद्यार्थ्यीनींच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यीनींसाठी बास्केटबॉल, हॉलीबॉल, टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.१० राजाराम विद्यालय, पंढरपूर

राजाराम इंग्लिश मिडियम स्कूल पंढरपूर, या शाळेची स्थापना १९९८ साली झाली आहे. ही मराठी माध्यम शाळा आहे. हि शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे. हि खाजगी विनाअनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रकिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची माध्यमिक वर्गांची एकुण विद्यार्थी संख्या २१५ आहे. एकुण शिक्षक संख्या १४आहे.शाळेमध्ये ग्रंथालय आहे.ग्रंथालयामध्ये एकुण ५७०५ इतकी पुस्तके उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे. शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट, बास्केटबॉल, हॉलीबॉल ,टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

### ३.३.११ रूक्मिणी विद्यालय, पंढरपूर

रूक्मिणी विद्यालय पंढरपूर, या शाळेची स्थापना २००१ साली झाली आहे. हि मराठी माध्यम शाळा आहे ही शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे. हि खाजगी विनाअनुदानित शाळा आहे. शाळेची प्रवेशप्रक्रिया दरवर्षी मे महिन्यात सुरू होते व जुलै महिन्यात शाळा सुरू होते. शाळेची एकुण विद्यार्थी संख्या ३८५ आहे. एकुण शिक्षक संख्या १७ आहे.शाळेमध्ये ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ५०४४ इतकी ग्रंथसंख्या उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासात शाळेचे योगदान आहे.शाळेने विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट, बास्केटबॉल, हॉलीबॉल, टेबलटेनिस इत्यादींसाठी मैदान उपलब्ध करून दिले आहे.

संशोधकाने सर्व शाळांविषयची वरील सर्व माहिती ग्रंथपाल प्रश्नावली तसेच प्रत्यक्ष भेटीदरम्यान ग्रंथपाल व शिक्षक यांच्याशी साधलेल्या संवादाद्वारे मिळविली आहे.

संदर्भसुची:-

1.http://allindiafacts.com/school/Maharashtra/solapur/pandharpur

2.www.google.com

2.www.schoolworld.in

3."तेजोनिधी", (२०१५) वार्षिक नियतकालिक, आपटे प्रशाला, पंढरपूर.

४."शादवल", (२०१४) वार्षिक नियतकालिक, विवेक वर्धिनी विद्यालय, पंढरपूर

# प्रकरण ४ थे

# माहिती संकलन, विश्लेशण आणि सादरीकरण

कोणत्याही विषयावर संशोधन करावयाचे म्हणजे त्या विषयाशी संबंधित माहिती शास्त्रोक्त पध्दतीने गोळा करून त्या माहितीची सुसंगत मांडणी करून त्या आधारे अनुमान आणि निष्कर्ष काढले जातात.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती ११ माध्यमिक शाळांच्या ग्रंथपालांकाडून प्रश्नावलीद्वारे मिळवली आहे.

तसेच संशोधकाने सदर संशोधनासाठी शिक्षकांकडून होणाऱ्या ग्रंथालयाच्या वापरासंबंधीची माहिती प्रश्नावलीद्वारे मिळविली आहे. प्रस्तुत ११ माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची एकुण संख्या २८४ आहे. या एकुण शिक्षकांपैकी संशोधनासाठी ११० शिक्षकांची यादृच्छिक पद्धतीने निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधन पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयांचा शिक्षकांकडून होणाऱ्या वापराचा अभ्यास असे असल्यामुळे विषयाला अनुसरून माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शाळांचे ग्रंथपाल यांची मते जाणून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ग्रंथालयातून शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांची माहिती मिळविणे आवश्यक आहे. अशी माहिती जाणुन घेण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरून ग्रंथालयाविषयी आणि शिक्षकांना ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा

सुविधांविषयी माहिती मिळविली. संकलित झालेली माहिती डेटा स्वरूपात उपलब्ध झाली. सदर प्रश्नावली परिशिष्टात जोडल्या आहेत.

## ग्रंथपाल प्रश्नावलीचे विश्लेषण आणि सादरीकरण

"पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर – एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्याकरिता संशोधकाने शाळेच्या ग्रंथालयाची माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्नावली या माध्यमाचा वापर करून त्याद्वारे शिक्षकांबरोबर ग्रंथपालांच्याही प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

सदर संशोधनासाठी संशोधकाने अभ्यासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांपैकी प्रत्येक माध्यमिक शाळेतील ग्रंथपाल याप्रमाणे ११ ग्रंथपाल प्रश्नावलीचे वितरण केले त्यास १००% प्रतिसाद मिळाला.

संकलित केलेली माहिती डेटा स्वरूपात उपलब्ध झाली. त्या माहितीचे सादरीकरण करण्यासाठी माहितीची योग्य चिकित्सा करून साचेबध्द तपशिलाच्या स्वरूपात विश्लेषण आणि सादरीकरण केलेले आहे.

### १ शाळेची सर्वसाधारण माहिती :

संशोधकाने ग्रंथपाल प्रश्नावलीमध्ये शाळेचे नाव, पत्ता व स्थापना वर्ष याविषयी शाळेची सर्वसाधारण माहिती विचारली असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

## तक्ता क्र.१

### शाळेची सर्वसाधारण माहिती

| अ.न. | शाळेचे नाव | शाळेचा पत्ता | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| १ | आपटे प्रशाला | जुन्या नगरपालिकेसमोर, पंढरपूर | १९१४ |
| २ | कवठेकर प्रशाला, | नाथचौक, पंढरपूर | १९४७ |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला, | वीर सावरकर पथ, पंढरपूर | १९६८ |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय, | काळा मारूती चौक, संतपेठ, पंढरपूर | १९७५ |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल, | मनिषा नगर, भाळवणी रोड पंढरपूर | १९७५ |
| ६ | लोकमान्य विद्यालय | म्युनिसिपल कौन्सिल, मेन बिल्डिंग समोर, पंढरपूर | १९८७ |
| ७ | यशवंत विद्यालय | लिंकरोड,के.बी.पी.कॉलेजच्या शेजारी, पंढरपूर | १९९0 |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | टाकळी रोड, पंढरपूर | १९९४ |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | सावरकर रोड, बडोदा बॅंकेसमोर, पंढरपूर | १९९५ |
| १0 | राजाराम विद्यालय | तनपुरे महाराज मठाशेजारी, पंढरपूर | १९९८ |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | पुंडलिक नगर, पंढरपूर | २00१ |

२ संशोधकाने ग्रंथपाल प्रश्नावलीमध्ये ग्रंथपालास शाळांची एकुण शिक्षक संख्या आणि विद्यार्थी संख्या याबद्दल माहिती विचारली असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली .


**तक्ता क . २**

एकुण विद्यार्थी व शिक्षक संख्या

| अ . नं | शाळेचे नाव | एकुण शिक्षक संख्या | एकुण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | आपटे प्रशाला | ३८ | ८१० |
| २ | कवठेकर प्रशाला, | ३१ | ९८५ |
| ३ | द . ह . कवठेकर प्रशाला | ३६ | ९४५ |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | २१ | ५२३ |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | ३२ | ४५० |
| ६ | लोकमान्य विद्यालय | ३४ | ५४८ |
| ७ | यशवंत विद्यालय | २३ | ४७५ |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | २० | ४५० |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | १८ | ३८० |
| १० | राजाराम विद्यालय | १४ | २१५ |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | १७ | ३८५ |

आकृती क.१

एकुण विद्यार्थी व शिक्षक संख्या




वरील आकृतीच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांपैकी आपटे प्रशाला, कवठेकर प्रशाला, द.ह. कवठेकर प्रशाला या शाळांची शिक्षक संख्या आणि विद्यार्थी संख्या इतर शाळांच्या तुलनेत जास्त आहे. विवेक वर्धिनी विद्यालय, इंग्लिश मिडियम स्कूल, लोकमान्य विद्यालय, यशवंत विद्यालय,अण्णा भाऊ साठे विद्यालय या शाळांची विद्यार्थी संख्या सरासरी ४०० च्या आसपास आहे.तर, श्रीमती

सखुबाई कन्या प्रशाला, राजाराम विद्यालय, रुक्मिणी विद्यालय या शाळांची विद्यार्थी संख्या कमी दिसत आहे.

## ३ ग्रंथालय सेवकवर्ग

३.१ ग्रंथालयामध्ये सेवकवर्ग किती आहे.असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क्र.३**

ग्रंथालय सेवकवर्ग

| अ.न. | सेवक वर्ग | ग्रंथालय संख्या |
|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | ११/११ |
| २ | सहायक ग्रंथपाल | -- |
| ३ | ग्रंथालय लिपिक | -- |
| ४ | शिपाई | ११/२ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११ पैकी ११ शाळांमध्ये ग्रंथालयासाठी ग्रंथपाल आहे.तर ११ पैकी २ शाळांमध्ये ग्रंथालय शिपाई आहे.सहायक ग्रंथपाल आणि ग्रंथालय लिपिक पदाचा सेवक वर्ग एकाही ग्रंथालयामध्ये उपलब्ध नाही.

३.२ ग्रंथालय सेवकवर्ग ग्रंथालय कामासाठी पुरेसा आहे का असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.४**

ग्रंथालय सेवकवग पुरेसा आहे का

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ० | ० |
| २ | नाही | ११ | १०० |
| | एकुण | ११ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की सर्व शाळेच्या ग्रंथालयामध्ये असलेला सेवकवर्ग त्यांच्या दैनंदिन कामासाठी पुरेसा नाही.असे मत सर्वच ग्रंथपालांनी नोंदविले आहे.

४ ग्रंथालय वापरासाठी प्रत्येक वर्गाला स्वतंत्र वेळापत्रक आहे का असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.५**

प्रत्येक वर्गास स्वतंत्र वेळापत्रक आहे का

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १००% |
| २ | नाही | ० | ० |
| | एकुण | ११ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की सर्व शाळेच्या ग्रंथालयाने प्रत्येक वर्गाला स्वतंत्र वेळापत्रक ठरविले आहे.ज्यामुळे ग्रंथपालास प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या गरजेनुसार वाचनसाहित्य उपलब्ध करून देता येईल.

४.१ परीक्षेच्या काळात ग्रंथालयाच्या वेळेत वाढ करण्यात येते का असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.६**

परीक्षेच्या काळात ग्रंथालयाची वेळ

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | 0 | 0 |
| २ | नाही | ११ | १00% |
| | एकुण | ११ | १00% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की कोणत्याही शाळेच्या ग्रंथालयाची वेळ परिक्षेच्या कालावधीत वाढविली जात नाही.ज्यामुळे विद्यार्थ्यास त्याच्या गरजेनुसार वाचनसाहित्याचा वापर करता येत नाही.

**५ वाचन कक्ष :**

५.१ वाचकांसाठी अभ्यासिका कक्ष आहे काय असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क्र.७**

वाचकांसाठी अभ्यासिका कक्ष

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | एकुण | ११ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की सर्व शाळेच्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासाला बसण्यासाठी वाचनकक्षाची सोय आहे.

५.२ वाचनकक्षात एकावेळी साधारण किती विद्यार्थी अभ्यासास बसू शकतात असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क्र.८**

वाचनकक्षाची विद्यार्थी क्षमता

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५० | ११ | १००% |
| २ | ५० ते १०० | ०० | ०० |
| ३ | १०० ते १५० | ०० | ०० |
| ४ | पेक्षा जास्त | ०० | ०० |
| | एकुण | ११ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की सर्व शाळेच्या ग्रंथालयामध्ये एकावेळेस साधारणतः ५० विद्यार्थी अभ्यासाला बसू शकतील एवढीच वाचनकक्षाची क्षमता आहे.

शाळेने ग्रंथालयामध्ये एकावळेस जास्तीत जास्त विद्यार्थी बसू शकतील याची सोय करावी. असे मत ग्रंथपालांनी त्यांच्याशी संवाद साधला असता नमूद केले.

५.३ संशोधकाने आपल्या संशोधन उद्दिष्टांमध्ये शिक्षकांना मिळणाऱ्या सोयी सुविधांचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट ठरविले आहे त्याची पडताळणी करण्यासाठी संशोधकाने ग्रंथपालास शिक्षकांसाठी स्वतंत्र अभ्यासिका आहे का असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.९**

शिक्षकांसाठी अभ्यासिका

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ४ | ३६ |
| २ | नाही | ७ | ६४ |
| | **एकुण** | ११ | १00% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११ शाळांपैकी फक्त ४म्हणजे ३६% शाळेच्या ग्रंथालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध आहे.तर ७ म्हणजे ६४% शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध नाही त्यामुळे त्या शाळांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांना एकाच वाचनकक्षात वाचनासाठी बसावे लागते आहे.

## ६ ग्रंथालय समिती :

ग्रंथालय समितीमुळे ग्रंथालयाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता येण्यास मदत होते तसेच शिक्षकांच्या ग्रंथालयीन कार्याच्या सहभागाची जाणीव होते त्यामुळे,

६.१ संशोधकाने ग्रंथालयासाठी ग्रंथालय समिती आहे काय असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

## तक्ता क्र.१०

ग्रंथालय समिती

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ६ | ५५ |
| २ | नाही | ५ | ४५ |
| | **एकुण** | ११ | **१००%** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११ शाळांपैकी फक्त ६ शाळांच्या ग्रंथालयासाठी ग्रंथालय समिती स्थापन केली आहे. ग्रंथालय समितीमुळे ग्रंथालयाच्या एकुण कारभारावर लक्ष ठेवता येते. तसेच शिक्षक आणि विद्यार्थी आपल्या समस्या व्यक्त करू शकतात.

६.२ ग्रंथालय समितीतीमध्ये कोण कोणत्या सदस्यांचा समावेश आहे असे विचारले असता ग्रंथालय समितीत शाळांनुसार खालीलप्रमाणे सदस्यांचा समावेश आहे असे दिसून येते.

तक्ता क्र.११

ग्रंथालय समितीमधील सदस्य

| अ.नं. | शाळेचे नाव | ग्रंथालय समितीमधील सदस्य | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुख्याध्यापक | ग्रंथपाल | शिक्षक प्रतिनिधी | विद्यार्थी प्रतिनिधी |
| १ | आपटे प्रशाला | १ | १ | १ | २ |
| २ | कवठेकर प्रशाला, | १ | १ | २ | २ |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला | १ | १ | २ | २ |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | १ | १ | २ | २ |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | १ | १ | १ | १ |
| ६ | लोकमान्य विद्यालय | - | - | - | - |
| ७ | यशवंत विद्यालय | - | - | - | - |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | - | - | - | - |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | १ | १ | १ | २ |
| १0 | राजाराम विद्यालय | - | - | - | - |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | - | - | - | - |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की आपटे प्रशाला आणि श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला या शाळांच्या ग्रंथालय समितीमध्ये मुख्याध्यापक, ग्रंथपाल, १ शिक्षक प्रतिनिधी आणि २ विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश आहे.तर,कवठेकर प्रशाला, द.ह. कवठेकर प्रशाला आणि विवेक वर्धिनी विद्यालय या शाळांच्या ग्रंथालय समितीमध्ये मुख्याध्यापक, ग्रंथपाल, २ शिक्षक प्रतिनिधी आणि २ विद्यार्थी प्रतिनिधी यांचा समावेश केला आहे.ग्रंथालयांच्या दृष्टीने

ही अतिशय चांगली गोष्ट आहे. यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी आपल्या समस्या व्यक्त करू शकतात.

## ७ अंदाजपत्रक :

७.१ ग्रंथालयाच्या वार्षिक अंदाजपत्रकावरून ग्रंथालयाची आर्थिक स्थिती लक्षात येते तसेच ग्रंथालयास किती महत्व दिले जात आहे याची कल्पना येते.त्यामुळे संशोधकाने ग्रंथपालास ग्रंथालयाचे वार्षिक अंदाजपत्रक साधारण किती आहे असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.१२**

ग्रंथालयाचा सरासरी खर्च

| अ.नं | शाळेचे नाव | ग्रंथालयाचा सरासरी खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १५ हजारापर्यंत | २५ हजारापर्यंत | ५० हजारापर्यंत | पेक्षा जास्त |
| १ | आपटे प्रशाला | - | √ | - | - |
| २ | कवठेकर प्रशाला | - | √ | - | - |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला | √ | - | - | - |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | √ | - | - | - |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | √ | - | - | - |
| ६ | लोकमान्य विद्यालय | √ | - | - | - |
| ७ | यशवंत विद्यालय | √ | - | - | - |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | √ | - | - | - |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | √ | - | - | - |
| १० | राजाराम विद्यालय | √ | - | - | - |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | √ | - | - | - |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११ शाळांपैकी ९ शाळांच्या ग्रंथालयांना साधारण वर्षाला १५ हजार रू.पर्यंत रक्कम ग्रंथालयाच्या खर्चासाठी मिळते.तर,आपटे

प्रशाला आणि कवठेकर प्रशाला या फक्त २ शाळांच्या ग्रंथालयांना वर्षाला अंदाजे २५ हजार रू.इतकी रक्कम ग्रंथालयाच्या खर्चासाठी मिळते.यावरून असे लक्षात येते की पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयास अतिशय कमी प्रमाणात आर्थिक पुरवठा होत आहे.हि अतिशय चिंतेची बाब आहे.कारण कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे ग्रंथालय हे त्या सस्थेचा आत्मा असतो .म्हणजेच ग्रंथालयाच्या एकुण स्थितीवरून त्या संस्थेच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते.

७.२ मागील तीन वर्षाचा ग्रंथालय करीत असलेल्या खर्चाचा तपशिल मागितला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.


**तक्ता क.१३**

मागील ३ वर्षाचा ग्रंथालयाच्या खर्चाचा तपशील

| अ.नं | शाळेचे नाव | मागील ३ वर्षाचा ग्रंथालयाच्या खर्चाचा तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१२ -२०१३ | २०१३ -२०१४ | २०१४ -२०१५ |
| १ | आपटे प्रशाला | ९५00 | १६000 | १९000 |
| २ | कवठेकर प्रशाला, | ७000 | ८000 | २१000 |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला, | ९000 | १०५00 | १२000 |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय , | ७000 | -- | १३५00 |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल, | ६000 | ११000 | १२000 |
| ६ | लोकमान्य विद्यालय | ६५00 | ७000 | ८५00 |
| ७ | यशवंत विद्यालय | ५४00 | ६000 | ९000 |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | ७५00 | ६४00 | ८000 |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | ७000 | ७५00 | ११000 |
| १0 | राजाराम विद्यालय | ५५00 | ६७00 | ८९५0 |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | ७५00 | ८000 | ९000 |

## आकृती क.२

मागील ३ वर्षाचा ग्रंथालयाच्या खर्चाचा तपशील




वरील स्तंभालेखामध्ये वर्ष २0१२ – १३ चा खर्च निळया रंगामध्ये , वर्ष २0१३ -१४ चा खर्च लाल रंगामध्ये तर वर्ष २0१४- १५ चा खर्च हिरव्या रंगामध्ये दर्शविण्यात आला आहे. स्तंभालेखाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की आपटे प्रशाला आणि कवठेकर प्रशाला या शाळेच्या ग्रंथालयासाठी वार्षिक साधारण २५हजार रू.प्रमाणे निधी उपलब्ध होत आहे.तर इतर शाळांना कमी प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे.

वरील शाळांपैकी विवेक वर्धिनी विद्यालय ,इंग्लिश मिडियम स्कूल, लोकमान्य विद्यालय, राजाराम विद्यालय,रूक्मिणी विद्यालय या शाळांना अतिशय कमी म्हणजे वर्षाला सरासरी ७ हजार रू.इतकाच निधी ग्रंथालयासाठी दिला जातो असे दिसते.

एकूण खर्चाच्या ५०% रक्कम ग्रंथालयीन सेवकवर्गावर (त्यांच्या वेतनावर)खर्च करावी असे डॉ. रंगनाथन यांनी सुचविले आहे.१९५७ च्या भारत सरकारच्या सल्लागार समितीने खालील प्रमाणे खर्चाची विभागणी असावी असे सुचविले आहे.

१. ग्रंथालयीन कर्मचारीवर्गाचे वेतन ५० %

२. वाचनसाहित्य २०%

३. नियतकालिके आणि वृत्तपत्रे ५%

४. ग्रंथाची निगा, देखभाल वगैरे २%

५. विमा, इमारत, भाडे वगैरे ५%

६. लेखनसामग्री, छपाई, उपकरणे वगैरे १३%

अर्थसंकल्प तयार करताना पुढील काही बाबींचा आवर्जुन विचार करावयास हवा. द्याचन साहित्याच्या वाढत्या किंमतीमुळे अर्थसंकल्पात फेरफार करावा लागतो.वेतन, भत्ते यामधील वाढ, नियतकालिकांच्या वर्गणीत वाढ विशेषतः ग्रंथालयात नियतकालिकांवर अधिक खर्च करावा लागतो.कारण त्यातून मिळणारी अद्यावत माहिती ही त्या ग्रंथालयाची गरज असते. त्यासाठी अर्थसंकल्पात यासाठी वाढीव रक्कमेची तरतूद करावी लागते.

## ८ ग्रंथनिवड आणि ग्रंथखरेदी :

८.१ ग्रंथालयामध्ये ग्रंथनिवड कोणत्या प्रकारे केली जाते असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.


तक्ता क्र.१४

ग्रंथनिवड

| अ.नं | पर्याय | ग्रंथालयाची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथ परिक्षणे | ११/५ | ४५ |
| २ | प्रकाशकांच्या याद्या | ११ /७ | ६४ |
| ३ | स्थानिक ग्रंथविक्रेते याद्या | ११/६ | ५५ |
| ४ | शिक्षक व विद्यार्थी शिफारशी | ११/९ | ८२ |

आकृती क्र .३

ग्रंथनिवड




वरील स्तभालेखाच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की एकुण ११ माध्यमिक शाळांपैकी ९म्हणजे ८२% शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या शिफारशींचा विचार करून ग्रंथ खरेदी केली जाते , स्थानिक ग्रंथ विक्रेत्यांच्या यादया पाहून ११ पैकी ६(५५%)

ग्रथालयांमध्ये ग्रंथ खरेदी केली जाते. तर ११ पैकी ७(६४%) ग्रंथालयांमध्ये प्रकाशकांच्या याद्या पाहून ग्रंथनिवड केली जाते.

एकुण विश्लेषणावरून असे लक्षात येते की जास्तीत जास्त शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या शिफारशींचा विचार करून ग्रंथ खरेदी केली जात आहे.

८.२ ग्रंथालयामध्ये ग्रंथखरेदी कोणाकडून करता असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.


**तक्ता क.१५**

ग्रंथखरेदी

| अ.नं | पर्याय | ग्रंथालयाची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | प्रकाशक | ३ | २७ |
| २ | लेखक | 0 | 0 |
| ३ | स्थानिक ग्रंथ विक्रेते | ८ | ७३ |
| ४ | इतर | 0 | 0 |
| | एकुण | ११ | १00% |

## आकृती क्र.४

### ग्रंथखरेदी




वरील आकृतीच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की एकुण ११ ग्रंथालयांपैकी ८ ग्रंथालयामध्ये स्थानिक ग्रंथ विक्रेत्यांकडून ग्रंथ खरेदी केली जाते तर ३ शाळांच्या ग्रंथालयामध्ये प्रकाशकांकडून ग्रंथ खरेदी केली जाते.

## ९ ग्रंथसंग्रह

९.१ संशोधकाने ग्रंथालयातील एकुण ग्रंथ संख्या किती आहे. असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.


# तक्ता क्र.१६

## एकुण ग्रंथ संख्या

| अ.नं. | शाळेचे नाव | ग्रंथालयातील एकुण ग्रंथसंख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | संदर्भ ग्रंथ | पाठयपुस्तके | अवांतर वाचनसाहित्य | एकुण |
| १ | आपटे प्रशाला | ४२ | ८६४० | ७५८६ | १६२६८ |
| २ | कवठेकर प्रशाला | १४४ | ८५०६ | ५५४० | १४१९० |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला | १७२ | १५१६८ | ५६०२ | २०९४२ |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | २८ | ५८४० | २९०० | ८७६८ |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | ३५ | २५०० | २५४० | ५०७५ |
| ६ | लोकमान्य विद्यालय | ४० | ३४४० | १५६० | ५०४० |
| ७ | यशवंत विद्यालय | ३८ | ३५०० | ३२३० | ६७६८ |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | ६० | ४५०० | ७०५० | ११६१० |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | ४१ | २५७८ | ४३२५ | ६९४४ |
| १० | राजाराम विद्यालय | २१ | १४२१ | ४२६३ | ५७०५ |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | ३४ | १४५० | ३५६० | ५०४४ |

आकृती क्र.५

एकुण ग्रंथ संख्या




वरील आलेखाच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, आपटे प्रशाला, कवठेकर प्रशाला, या शाळांची एकुण ग्रंथसंख्या साधारण १५ हजारांपेक्षा जास्त आहे. द.ह कवठेकर प्रशाला या शाळेची ग्रंथसंख्या सर्वात जास्त आहे.तर,विवेक वर्धिनी विद्यालय, इंग्लिश मिडियम स्कूल,लोकमान्य विद्यालय, यशवंत विद्यालय, अण्णा भाऊ साठे विद्यालय या शाळांची एकुण ग्रंथसंख्या १0 हजाराच्या आसपास आहे.परंतु या शाळांच्या ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्याची संख्याही त्यामानाने चांगली आहे.

येथे ग्रंथपालाशी झालेल्या मुलाखतीतून माहिती मिळाली की,या शाळांचे ग्रंथपाल विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाच्या दिनी गोष्टीची पुस्तके तसेच इतर शालोपयोगी वाचनसाहित्य स्वीकारतात.ग्रंथपालांचा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे.कारण वाढदिवसाला इतर वायफळ खर्च करण्यापेक्षा एखादे पुस्तक ग्रंथालयास दिल्यास त्याचा वापर सर्वांना होऊ शकतो.

९.२ शिक्षकांना एकावेळी किती ग्रंथ दिले जातात. असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.१७**

शिक्षकांना एकावेळेस दिली जाणारी ग्रंथसंख्या

| अ.नं. | शाळेचे नाव | शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या ग्रंथांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दोन | तीन | पाच | पेक्षा जास्त |
| १ | आपटे प्रशाला | - | √ | - | - |
| २ | कवठेकर प्रशाला, | - | √ | - | - |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला | √ | - | - | - |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | - | √ | - | - |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | √ | - | - | - |
| ६ | लोकमान्य विद्यालय | √ | - | - | - |
| ७ | यशवंत विद्यालय | √ | - | - | - |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | √ | - | - | - |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | √ | - | - | - |
| १0 | राजाराम विद्यालय | √ | - | - | - |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | √ | - | - | - |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ ग्रंथालयापैकी आपटे प्रशाला, कवठेकर प्रशाला आणि विवेक वर्धिनी विद्यालय या शाळांच्या ग्रंथालयातून एका शिक्षकास ३ पुस्तके दिली जातात तर इतर ८ शाळांच्या ग्रंथालयातून शिक्षकास एकावेळेस २ पुस्तके दिली जातात.

### १० ग्रंथालय उपक्रम :

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून खालील कोणते उपक्रम राबविले जातात.

**तक्ता क.१८**

ग्रंथालय उपक्रम

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | निबंध स्पर्धा | ११/११ | १00 |
| २ | वक्तृत्व स्पर्धा | ११/११ | १00 |
| ३ | विविध नेत्यांच्या जयंती/पुण्यतिथी | ११/११ | १00 |
| ४ | चर्चा सत्र | ११/0 | 0 |
| ५ | ग्रंथ प्रदर्शन | ११/२ | १८ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ ग्रंथालयापैकी ११ ग्रंथालयातून निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विविध नेत्यांच्या जयंती/पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात तर ११ पैकी फक्त २ ग्रंथालयांमध्ये ग्रंथप्रदर्शन आयोजित केले जाते.तर चर्चा सत्रांचे आयोजन एकाही ग्रंथालयात केले जात नसल्याचे दिसते.

११ ग्रंथेत्तर साहित्य :

११.१ ग्रंथालयात ग्रंथेत्तर साहित्य आहे काय असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.१९**

ग्रंथेत्तर साहित्य

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | एकुण | ११ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व ग्रंथालयांमध्ये ग्रंथेतर साहित्य उपलबध आहे.

११.२ संशोधकाने ग्रंथपालास आपल्या ग्रंथालयात खालील पैकी कोणते **मुद्रित ग्रंथेत्तर** साहित्य उपलब्ध आहे असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्श विल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.२०**

मुद्रित ग्रंथेत्तर साहित्य

| अ.न. | मुद्रित ग्रंथेत्तर साहित्य | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | तक्ते | ११ | १०० |
| २ | नकाशे | ११ | १०० |
| ३ | हस्त पुस्तिका | ०४ | ३६ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व ग्रंथालयांमध्ये तक्ते आणि नकाशे हे मुद्रित ग्रंथेतर साहित्य उपलब्ध आहे तर हस्तपुस्तिका हा साहित्य प्रकार ११ पैकी ४ ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे.

११.३ आपल्या ग्रंथालयात खालील पैकी कोणते **अमुद्रित ग्रंथेत्तर साहित्य** आहे.

**तक्ता क.२१**

अमुद्रित ग्रंथेत्तर साहित्य

| अ.न. | अमुद्रित ग्रंथेत्तर साहित्य | ग्रंथालयांची संख्या |
|---|---|---|
| १ | ग्लोब | ११ |
| २ | सी.डी रॉम | ११ |
| ३ | चित्रे व छायाचित्रे | ११ |
| ४ | प्रतीकृती | ११ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व म्हणजे ११ ग्रंथालयांमध्ये ग्लोब, सी.डी रॉम, चित्रे व छायाचित्रे आणि प्रतीकृती हे अमुद्रित ग्रंथेतर साहित्य उपलब्ध आहे.म्हणजेच पंढरपूर शहरातील सर्व माध्यमिक शाळेतील ग्रंथालयामध्ये अमुद्रित ग्रंथेतर साहित्य उपलब्ध आहे.

## १२ नियतकालिके :

१२.१ नियतकालिके हा ग्रंथालयातील अतिशय महत्वाचा वाचनसाहित्य प्रकार आहे.शिक्षकांना त्यांच्या विषयाचे प्रचलित ज्ञान मिळविण्यासाठी नियतकालिके महत्वाची भुमिका बजावतात त्यामुळे संशोधकाने ग्रंथपालास ग्रंथालयात

नियतकालिके खरेदी केली जातात काय असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.२२**

नियतकालिके उपलब्धता

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १00 % |
| २ | नाही | 00 | 00 |
| | एकुण | ११ | १00% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व म्हणजे १00% ग्रंथालयांमध्ये नियतकालिके खरेदी केली जातात.

१२.२ होय असल्यास ग्रंथालयात येणा-या नियतकालिकांची संख्या किती असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.२३**

नियतकालिकांची संख्या

| अ.नं. | नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयाची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | पाच ते दहा | ११ | १00 |
| २ | दहा ते वीस | 0 | 0 |
| ३ | वीस ते तीस | 0 | 0 |
| ४ | पेक्षा जास्त | 0 | 0 |
| | एकुण | ११ | १00 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व म्हणजे ११ ग्रंथालयांमध्ये साधारण ५ ते १० नियतकालिकांची खरेदी केली जाते. पंढरपूर शहरातील कोणत्याही शाळेमध्ये १० ते वीस किंवा २० ते ३० नियतकालिके खरेदी केली जात नाहीत. नियतकालिकांची ही संख्या तसे पाहता कमी आहे. त्यामुळे ग्रंथालयांनी आणखी नियतकालिकांची खरेदी करणे आवश्यक आहे.

१२.३ नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी दिली जातात का किती असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.२४**

नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी

| अ.नं. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १०० % |
| २ | नाही | ०० | ०० |
| | एकुण | ११ | १००% |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व म्हणजे १००% ग्रंथालयांमध्ये नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी दिली जातात.

१२.४ एकावेळी किती नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी दिली जातात असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

तक्ता क्र.२५

एकावेळी किती नियतकालिके

| अ.नं | नियतकालिके शिक्षकांना | ग्रंथालयाची संख्या | टक्केवारी% |
|---|---|---|---|
| १ | एक | ८ | ७३ |
| २ | दोन | ३ | २७ |
| ३ | तीन | 0 | 0 |
| ४ | पेक्षा जास्त | 0 | 0 |
| | एकुण | ११ | १00 |

वरील तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांच्या ग्रंथालयांपैकी ८ ग्रंथालयातून शिक्षकांसाठी १ नियतकालिक घरी दिले जाते तर ३ शाळांच्या ग्रंथालयातून २ नियतकालिके घरी दिली जातात.

१३ वृत्तपत्रे :

१३.१ शिक्षकांना मिळणाऱ्या सोयी सुविधांचा पडताळा घेण्यासाठी संशोधकाने ग्रंथपालास ग्रंथालयात वृत्तपत्रे खरेदी केली जातात का असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

तक्ता क्र.२६

वृत्तपत्रे

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १00 % |
| २ | नाही | 00 | 00 |
| | एकुण | ११ | १00% |

वरील तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की सर्व शाळांच्या ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रे खरेदी केली जातात.

१३.२ होय असल्यास ग्रंथालयात येणा-या वृत्तपत्रांची संख्या किती असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.२७**

वृत्तपत्रांची संख्या

| अ.नं | वृत्तपत्रे | ग्रंथालयाची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | दोन | ८ | ७३ |
| २ | पाच | ३ | २७ |
| ३ | सात | 0 | 0 |
| ४ | पेक्षा जास्त | 0 | 0 |
| | एकुण | ११ | १00 |

वरील तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांच्या ग्रंथालयापैकी ८ म्हणजे ७३% ग्रंथालयांमधये २ वर्तमानपत्रे खरेदी केली जातात तर ३ म्हणजे २७% शाळांच्या ग्रंथालयातून ५ वर्तमानपत्रांची खरेदी केली जाते.

१३.३ ग्रंथालयात कोणकोणत्या भाषेतील वृत्तपत्रे येतात. असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

तक्ता क्र.२८

कोणकोणत्या भाषेतील वृत्तपत्रे

| अ.नं. | शाळेचे नाव | ग्रंथालयात येणाऱ्या वर्तमानपत्रांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| १ | आपटे प्रशाला | √ | √ | √ |
| २ | कवठेकर प्रशाला, | √ | √ | √ |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला | √ | - | - |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | √ | √ | √ |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | - | - | √ |
| ६ | लोकमान्य विद्यालय | √ | - | - |
| ७ | यशवंत विद्यालय | √ | - | - |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | √ | - | - |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | √ | - | - |
| १0 | राजाराम विद्यालय | √ | - | - |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | √ | - | - |

वरील तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांच्या ग्रंथालयापैकी ७ ग्रंथालयांमध्ये फक्त मराठी भाषेतील वर्त मानपत्रे खरेदी केली जातात. इंग्लिश मिडियम स्कूल,पंढरपूर या शाळेत फक्त इंग्रजी वर्त मानपत्र घेतले जाते. तर,आपटे प्रशाला, कवठेकर प्रशाला, विवेक वर्धिनी विद्यालय या ३ शाळांच्या ग्रंथालयामध्ये मराठी, हिंदी ,इंग्रजी अश्या भाषेतील वर्तमानपत्रांची खरेदी केली जाते.

१४ ग्रंथालयात संगणक वापर :

१४.१ ग्रंथालयात संगणक आहे का असा प्रश्न विचारला खालील तक्त्यामध्ये दर्श विल्याप्रमाणे माहिती मिळाली.


**तक्ता क.२९**

संगणक उपलब्धता

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ३ | २७ % |
| २ | नाही | ८ | ७३% |
| | एकुण | ११ | १००% |

**आकृती क.६**

संगणक उपलब्धता



वरील आकृतीच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांच्या ग्रंथालयापैकी ३ म्हणजे २७% ग्रंथालयांमध्ये संगणक आहे. तर ७३%ग्रंथालयांमध्ये संगणक उपलब्ध नाही.

१४.२ होय, असल्यास संगणकाचा वापर कोणत्या कामासाठी केला जातो असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.३०**

ग्रंथालयात संगणकाचा होणारा वापर

| अ.न. | शाळेचे नाव | ग्रंथालयात संगणकाचा होणारा वापर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ग्रंथ दाखलनोंद करण्यासाठी | ग्रंथ देवघेव करण्यासाठी | ग्रंथ परिगणन | कार्यालयीन कामासाठी |
| १ | आपटे प्रशाला | √ | - | - | √ |
| २ | कवठेकर प्रशाला, | √ | - | - | √ |
| ३ | द.ह. कवठेकर प्रशाला | √ | - | - | √ |
| ४ | विवेक वर्धिनी विद्यालय | - | - | - | - |
| ५ | इंग्लिश मिडियम स्कूल | - | - | - | - |
| ६ | लोकमान्य विद्यालय | - | - | - | - |
| ७ | यशवंत विद्यालय | - | - | - | - |
| ८ | अण्णा भाऊ साठे विद्यालय | - | - | - | - |
| ९ | श्रीमती सखुबाई कन्या प्रशाला | - | - | - | - |
| १0 | राजाराम विद्यालय | - | - | - | - |
| ११ | रूक्मिणी विद्यालय | - | - | - | - |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळांच्या ग्रंथालयापैकी आपटे प्रशाला, कवठेकर प्रशाला आणि द.ह. कवठेकर प्रशाला या ३ शाळांच्या ग्रंथालयांमध्ये संगणक उपलब्ध आहे आणि त्याचा वापर ग्रंथांची दाखल नोंद करण्यासाठी आणि कार्यालयीन कामासाठी केला जातो.इतर ८ शाळांमध्ये संगणक उपलब्ध नाही.

## शिक्षक प्रश्नावलीचे विश्लेषण आणि सादरीकरण

"पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारागं्रथालयाचा वापर – एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्याकरिता संशोधकाने शिक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी प्रश्नावली या माध्यमाचा वापर करून त्याद्वारे शिक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

सदर संशोधनासाठी संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या एकुण ११ शाळापैकी प्रत्येक माध्यमिक शाळेतील १0 शिक्षक याप्रमाणे ११0 प्रश्नावलीचे वितरण केले त्यास १00 टक्के प्रतिसाद मिळाला.

संकलित केलेली माहिती डेटा स्वरूपात उपलब्ध झाली. त्या माहितीचे सादरीकरण करण्यासाठी माहितीची योग्य चिकित्सा करून साचेबध्द तपशिलाच्या स्वरूपात विश्लेषण आणि सादरीकरण केलेले आहे.

### १. संशोधकाने शिक्षकांना ग्रंथालयाच्या वापराबाबत प्रश्न विचारले

१.१ संशोधकाने आपल्या संशोधन प्रकल्पामध्ये ठरविलेल्या उद्धिष्टांमध्ये पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक ग्रंथालयाचा वापर कितपत करतात याचा शोध घेणे या उद्धिष्टाचा समावेश आहे. त्यानुसार त्या उद्धिष्टाच्या सिद्धतेसाठी संशोधकाने शिक्षकांना ग्रंथालयाचा वापर किती करता म्हणजे साधारण किती दिवसातून ग्रंथालयात जाता असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्श विल्याप्रमाणे माहिती मिळाली.


तक्ता क्र.१

ग्रंथालयात किती दिवसातून जाता

| अ.नं. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | दररोज | ४३ | ३९ |
| २ | दोन ते तीन दिवसातून एकदा | ६७ | ६१ |
| ३ | आठवडयातून एकदा | ० | ० |
| ४ | महिन्यातून एकदा | ० | ० |
| | एकुण | ११० | १०० |

आकृती क्र. १

ग्रंथालयात किती दिवसातून जाता



वरील स्तंभालेखाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की एकुण ११0 शिक्षकांपैकी ३९% शिक्षकांनी दररोज ग्रंथालयात जातो असे सांगितले, तर ६१%शिक्षकांनी दोन ते तीन दिवसातून गंथालयात जातो असे सांगितले तर आठवडयातून एकदा आणि महिन्यातून एकदा ग्रंथालयात जात असल्याचे पर्यायास कोणताच प्रतिसाद मिळाला नाही.म्हणजेच जास्तीत जास्त शिक्षक दोन ते तीन दिवसातून ग्रंथालयात जातात.

शिक्षकांनी दररोज ग्रंथालयात जाणे गरजेचे असते कारण ग्रंथालयाच्या जास्तीत जास्त वापराने विद्यार्थ्यांना अधिक प्रचलित माहिती मिळवून देण्यास मदत होऊ शकते.

१.२ ग्रंथालयात कोणत्यावेळी जाता म्हणजे शाळा भरण्यापूर्वी, रिकाम्या तासाच्यावेळी, मधल्या सुट्टीत कि शाळा सुटल्यावर असे विचारले असता दिलेल्या पर्यायांपैकी एक शिक्षक अनेक पर्याय अवलंबित असल्याचे दिसते.म्हणजेच शिक्षकांची ग्रंथालयात जाण्याची एक ठराविक वेळ ठरलेली नाही.शिक्षक आपल्या सोयीनुसार वेळोवेळी वेगवेगळे पर्याय निवडतात. त्यानुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.


**तक्ता क.२**

शिक्षकांची ग्रंथालयात जाण्याची वेळ

| अ.नं. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | शाळा भरण्यापूवी | ४८ | ४४ |
| २ | रिकाम्या तासाच्यावेळी | ८५ | ७७ |
| ३ | मधल्या सुट्टीत | ६५ | ५९ |
| ४ | शाळा सुटल्यानंतर | २३ | २१ |

आकृती क्र. २

शिक्षकांची ग्रंथालयात जाण्याची वेळ




वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे दिसते की ११० शिक्षकांपैकी ६१ म्हणजे ४४% शिक्षकांनी शाळा भरण्यापूर्वी , ११० पैकी ८५ म्हणजे ७७%_शिक्षकांनी रिकाम्या तासाच्यावेळी जसा वेळ मिळेल तसा ग्रंथालयात जात असल्याचे सांगितले, तर ११० पैकी ६५ म्हणजे ५९% मधल्या सुट्टीत शिक्षकांनी ग्रंथालयात जात असल्याचे सांगितले आणि ११० पैकी २३ म्हणजे २१% शिक्षकांनी शाळा सुटल्यानंतर ग्रंथालयात जात असल्याचे सांगितले.


वरील विश्लेषणानुसार असे लक्षात येते की शिक्षक आपल्या सोयीनुसार ग्रंथालयात जातात.

एकुण असे दिसते की जास्तीत जास्त शिक्षक रिकाम्या तासाच्यावेळी ग्रंथालयात जातात आणि शाळा सुटल्यानंतर खूप कमी शिक्षक ग्रंथालयात जातात यावरून असे लक्षात येते की बहुतेक शाळांची ग्रंथालये शाळा सुटल्यानंतर बंद होतात ज्यामुळे शिक्षकांना ग्रंथालयाचा वापर करता येत नाही.

१.३ ग्रंथालयास भेट देण्याचा आपला प्रमुख हेतू कोणता असतो. असे विचारले खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

आकृती.३


ग्रंथालयास भेट देण्याचा प्रमुख हेतू




वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे लक्षात येते की एकुण ११0 शिक्षकांपैकी ७३% शिक्षकांनी आपल्या अध्यापन विषयाची सखोल माहिती मिळविण्यासाठी , १८% शिक्षक संदर्भ पुस्तके चाळण्यासाठी आणि ९% शिक्षक वर्तमानपत्रे /साप्ताहिके वाचण्यासाठी ग्रंथालयात जात असल्याचे सांगितले तर एखादा लेख शोधण्यासाठी ग्रंथालयात जात असल्याचे एकाही शिक्षकाने सांगितले नाही. म्हणजेच पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील जास्तीत जास्त शिक्षक आपल्या अध्यापन विषयाची सखोल माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयात जातात , तर संदर्भ पुस्तके चाळण्यासाठी आणि वर्तमानपत्रे /साप्ताहिके वाचण्यासाठी कमी शिक्षक ग्रंथालयात जातात.

१.४ आपणांस आवश्यक असणारी माहिती मिळविण्यास अडचण निर्माण झाल्यास काय करता, असे विचारले असता खालील आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

आकृती क.४




वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे दिसते की एकुण ११० शिक्षकांपैकी ८९ म्हणजे ८१% शिक्षकांनी आवश्यक ती माहिती मिळण्यास अडचण निर्माण झाल्यास ग्रंथपालास /सहाय्यक ग्रंथपालास विचारतो असे सांगितले तर ११० पैकी ५४% शिक्षकांनी ग्रंथालयातील उपलब्ध पुस्तकांमधून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतो असे सांगितले तर ,११० पैकी २३% शिक्षकांनी इतर पर्याय म्हणजे इंटरनेटवरून किंवा विषयाशीसंबंधित व्यक्तिंकडून माहिती मिळवितो असे सांगितले. म्हणजेच पंढरपूर शहरातील माध्यमिक


शाळेतील सर्व शिक्षक ग्रंथालयातून माहिती मिळवताना आपल्याला आलेल्या अडचणींवर वरील पर्यायांच्या मदतीने मात करून माहिती प्राप्त करून घेतात.

वरील प्राप्त माहितीच्या एकुण विश्लेषणावरून असे लक्षात येते की साधारणपणे शिक्षक विविध पर्यायांच्या मदतीने आपल्या अडचणींवर मात करतात असे दिसते.

१.५ संशोधकाने शिक्षकांना वाचनासाठी पुस्तकाची निवड कशी करता असे विचारले असता खालील आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

### आकृती क्र.५

वाचनासाठी पुस्तकाची निवड कशी करता




वरील स्तंभालेखचे विश्लेषण करता असे दिसते की ११० शिक्षकांपैकी ५१% शिक्षकांनी ग्रंथपालास विचारून, ३७% शिक्षकांनी ग्रंथालय तालिका पाहून तर एकुण शिक्षकांच्या ८२% शिक्षकांनी पुस्तकाचे प्रास्ताविक वाचून वाचनासाठी पुस्तकाची निवड करत असल्याचे सांगितले. शिक्षकांनी इतरांकडून माहिती घेऊन या पर्यायास सर्वात कमी

प्रतिसाद मिळाला आहे. म्हणजेच जास्तीत जास्त शिक्षक वाचनासाठी स्वत: पुस्तकाची निवड करतात शिक्षक ज्या त्या परिस्थितीनुसार पर्याय निवडत असल्याचे दिसते.

१.६ प्रभावी अध्यापनासाठी ग्रंथालयाचा वापर अनिवार्य वाटतो का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.३**

ग्रंथालयाचा वापर अनिवार्य वाटतो का

| अ.नं | **पर्याय** | **प्रतिसाद** | टक्केवारी **%** |
|---|---|---|---|
| १ | होय | ११० | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | एकुण | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की माध्यमिक शाळेतील शिक्षक ग्रंथालयाच्या वापराचे महत्व जाणतात. जर शाळेच्या ग्रंथालयाने शिक्षकांना आवश्यक असणा या सुविधा पुरविल्या तर अध्यापन कार्य अधिक चांगले होऊ शकते असे सर्व शिक्षकांचे मत आहे.

१.७ ग्रंथ खरेदीसाठी ग्रंथपालास शिफारस करता का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

### तक्ता क्र.४

ग्रंथ खरेदीसाठी ग्रंथपालास शिफारस करता का

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११० | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | एकुण | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की माध्यमिक शाळेतील १०० % शिक्षक आपल्याला आवश्यक असणाऱ्या ग्रंथाची ग्रंथपालाकडे शिफारस करतात.

१.८ ग्रंथालयात कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदी करण्याकरिता शिफारस करता का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.


### तक्ता क्र.५

कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदीस शिफारस

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | संदर्भ ग्रंथ | २७ | २५ |
| २ | क्रमिक ग्रंथ | ६५ | ५९ |
| ३ | अवांतर वाचनसाहित्य | १८ | १६ |
| | एकुण | ११० | १०० |

## आकृती क्र.६

कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदीस शिफारस





वरील आकृतीवरून असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी ५९%शिक्षकांनी क्रमिक पुस्तकांसाठी शिफारस करत असल्याचे सांगितले , २५% शिक्षकांनी संदर्भ पुस्तकांसाठी शिफारस करत असल्याचे सांगितले आहे तर १६% शिक्षकांनी अवांतर वाचनासाठीच्या पुस्तकांसाठी शिफारस करत असल्याचे सांगितले .

१.९ विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आपण कसे प्रोत्साहित करता असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

### आकृती क्र.७

### विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे उपाय




वरील आकृतीचे विश्लेषण करता ११0 पैकी ५८% शिक्षकांनी रिकाम्या तासाच्यावेळी विध्यार्थ्यांना ग्रंथालयात घेऊन जाऊन,२५% शिक्षकांनी ग्रंथालयात असलेली विविध पुस्तके वाचावयास सांगून आणि १७% शिक्षकांनी विविध शैक्षणिक उपकम राबविल्यास विद्यार्थी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करतील असे वाटते .

वरील विश्लेषणावरून असे लक्षात येते की शिक्षक विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी प्रोत्साहित करतात.

१.१० विज्ञान, तंत्रज्ञान व प्रचलित माहिती देणारे वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रंथपालास शिफारस करता का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.६**

वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रंथपालास शिफारस

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ११0 | १00 |
| २ | नाही | 0 | 0 |
| | एकुण | ११0 | १00 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की ११0 म्हणजे १00% शिक्षकांनी होय असे उत्तर दिले म्हणजेच शिक्षक ग्रंथालयातील वाचनसाहित्याविषयी जागरूक आहेत असे दिसते.

१.११ आपल्या शाळेच्या ग्रंथालयाद्वारे होणा-या कार्यक्रमात आपला सहभाग असतो का असे विचारले असता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क.७**

ग्रंथालयाद्वारे होणा-या कार्यक्रमात सहभाग

| अ.नं | **पर्याय** | **प्रतिसाद** | **टक्केवारी %** |
|---|---|---|---|
| १ | होय | ११0 | १00 |
| २ | नाही | **0** | **0** |
| | **एकुण** | ११0 | १00 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११0 शिक्षकांपैकी ११0 म्हणजे १00% शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयाद्वारे होणा-या कार्यकमात सहभागी होत असल्याचे सांगितले.म्हणजेच सर्व शिक्षक आपल्या ग्रंथालयाच्या विविध कार्यकमात सहभागी होतात.

**२. ग्रंथालयाकडून शिक्षकांना मिळणा-या सोयी सुविधांबाबत:**

संशोधकाने आपल्या संशोधन उद्दिष्टांमध्ये पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना मिळणा-या सेवा सुविधांचा अभ्यास करणे,या उद्दिष्टाचा समावेश केला आहे.त्यानुसार संशोधकाने शिक्षकांना खालील प्रश्न विचारून डेटा संकलित केला आहे.

२.१ दैनंदिन वेळेशिवाय ग्रंथालय आणखी कधी कधी चालू असावे असे वाटते असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.


### तक्ता क्र.८

ग्रंथालयाच्या वेळीची अपेक्षा

| अ.नं. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | रविवारी | २८ | २५ |
| २ | इतर सुट्टीच्या दिवशी | ३४ | ३१ |
| ३ | शाळा सुटल्यानंतर | ४८ | ४४ |
| | **एकुण** | ११० | १०० |

### आकृती क्र.८

ग्रंथालयाच्या वेळीची अपेक्षा



वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे लक्षात येते की ११0 शिक्षकांपैकी २८ म्हणजे २५%शिक्षकांनी रविवारी असे मत नोंदविले ३४ म्हणजे ३१% शिक्षकांनी इतर सुट्टीच्या दिवशी असे मत नोंदविले तर ४८ म्हणजे ४४% शिक्षकांनी शाळा सुटल्यानंतर असे मत नोंदविले आहे.यावरून असे म्हणता येईल की शिक्षक रविवारी किंवा इतर सुट्टीच्या दिवशी शाळेत येण्याऐवजी शाळा सुटल्यानंतर ग्रंथालयात जाण्यास उत्सुक असल्याचे दिसते.

२.२ ग्रंथालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध आहे का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.


**तक्ता क.९**

वाचनकक्ष उपलब्धता

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ४0 | ३६ |
| २ | नाही | ७0 | ६४ |
| | एकुण | ११0 | १00% |

आकृती क्र.९

वाचनकक्ष उपलब्धता




वरील आकृतीवरून असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी ४०म्हणजे ३६% शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे असे सांगितले आहे तर ६४% शिक्षकांनी वाचनकक्ष नाही असे सांगितले आहे.यावरून असे लक्षात येते की बहुसंख्य शाळांच्या शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध नाही. शाळेच्या व्यवस्थापनाने जर शिक्षकांना स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध करून दिला तर शिक्षक आपल्या अध्यापन विषयाची तयारी अधिक चांगल्याप्रकारे करू शकतील .

२.३ ग्रंथालयाचे वातावरण अभ्यासाच्या दृष्टीने पूरक आहे का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क.१०**

ग्रंथालयाचे वातावरण

| अ.नं | **पर्याय** | **प्रतिसाद** | **टक्केवारी %** |
|---|---|---|---|
| १ | होय | ४८ | ४४ |
| २ | नाही | ६२ | ५६ |
| | **एकुण** | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी ४८म्हणजे ४४% शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयाचे वातावरण अभ्यासाच्या दृष्टीने पुरक आहे असे सांगितले आहे तर ५६% शिक्षकांनी ग्रंथालयाचे वातावरण अभ्यासाच्या दृष्टीने पुरक नाही असे सांगितले आहे.यावरून असे लक्षात येते की बहुसंख्य शाळांच्या शिक्षकांना अभ्यासासाठीपुरक वातावरण उपलब्ध होत नाही.

२.४ ग्रंथालयातून ग्रंथेत्तर साहित्य मिळते का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क.११**

ग्रंथेत्तर साहित्य मिळते का

| अ.नं | **पर्याय** | **प्रतिसाद** | **टक्केवारी %** |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८ | ३५ |
| २ | नाही | ७२ | ६५ |
| | **एकुण** | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून  असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी ३५% शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयातून ग्रंथेत्तर साहित्य मिळते आणि ६५% शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयातून ग्रंथेत्तर साहित्य मिळत नाही असे सांगितले. यावरून असे लक्षात येते की जास्तीत जास्त शिक्षकांना ग्रंथेत्तर साहित्य मिळत नाही.

२.५ संशोधकाने शिक्षकांना ग्रंथालयातून इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिली जाते का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क.१२**

इंटरनेट सुविधा उपलब्धता

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | २८ | २५ |
| २ | नाही | ८२ | ७५ |
| | एकुण | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून  असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी २५% शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयातून इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिली जाते असे सांगितले. तर ७५% शिक्षकांनी इंटरनेट सुविधा मिळत नाही असे सांगितले. यावरून असे लक्षात येते की शिक्षकांना इंटरनेट सुविधा पुरविणाऱ्या शाळांची संख्या खुपच कमी आहे.

शाळेच्या व्यवस्थापनाने शिक्षकांना इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, जेणेकरून शिक्षक आपल्या विषयातील प्रचलित माहिती मिळवू शकतील आणि त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल.

२.६ संशोधकाने शिक्षकांना इंटरनेट सुविधेचा वापर आपण कशासाठी करता असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.


**तक्ता क.१३**

इंटरनेट सुविधेचा वापर आपण कशासाठी करता

<table>
<tr><th>अ.नं</th><th>पर्याय</th><th>प्रतिसाद</th><th>टक्केवारी %</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रचलित घडामोडींची माहिती मिळविण्यासाठी</td><td rowspan="2">२८</td><td rowspan="2">२५</td></tr>
<tr><td>२</td><td>अध्यापनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी</td></tr>
<tr><td>३</td><td>कोणताही प्रतिसाद नाही</td><td>८२</td><td>७५</td></tr>
</table>

आकृती क.१०

इंटरनेट सुविधेचा वापर आपण कशासाठी करता




वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे लक्षात येते की ११० शिक्षकांपैकी २८ म्हणजे २५%शिक्षकांनी प्रचलित घडामोडींची माहिती मिळविण्यासाठी आणि अध्यापनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर करत असल्याचे सांगितले आहे.उर्वरित

८२ म्हणजे ७५% शिक्षकांनी कोणताही प्रतिसाद नोंदविला नाही. यामध्ये या प्रश्नासाठी कोणताही प्रतिसाद न नोंदविणारे शिक्षक ते आहेत ज्यांना इंटरनेट सुविधाच मिळत नाही.

२.७ संशोधकाने शिक्षकांना ग्रंथपालांकडून आपणास आवश्यक ती मदत वेळेत मिळते का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क.१४**

आवश्यक ती मदत वेळेत मिळते का


| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | ४३ |
| २ | नाही | ६३ | ५७ |
| | एकुण | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी ४३% शिक्षकांनी ग्रंथपालांकडून आपणास आवश्यक ती मदत वेळेत मिळते असे सांगितले आहे तर ५७% शिक्षकांनी ग्रंथपालांकडून आपणास आवश्यक ती मदत वेळेत मिळत नाही असे सांगितले.

२.८ संशोधकाने शिक्षकांना ग्रंथालयातून इतर कोणत्या सेवासुविधा मिळाव्यात असे आपणास वाटते.असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

आकृती क.११

इतर कोणत्या सेवासुविधा मिळाव्यात




वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे लक्षात येते की ११० शिक्षकांपैकी ५४ म्हणजे ४९% शिक्षकांनी संदर्भसेवा ,११० पैकी १० म्हणजे ९% शिक्षकांनी वृत्तपत्र कात्रण सेवा, ,११० पैकी ४५ म्हणजे ४१% शिक्षकांनी झेरॉक्स सेवा तर ,११० पैकी ७४म्हणजे ६७% शिक्षकांनी ग्रंथालयातून इंटरनेट सुविधा मिळावी असे मत नोंदविले आहे.

वरील विश्लेषणावरून असे लक्षात येते की शिक्षकांना आवश्यक ती संदर्भसेवा, झेरॉक्स सेवा , इंटरनेट सुविधा मिळत नाही. आणि त्या मिळाव्यात असे ब-याच शिक्षकांना वाटते.

### ३.वाचनसाहित्य उपलब्धतेबाबत

संशोधकाने आपल्या संशोधन उद्दिष्टांमध्ये पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या गरजेनुसार वाचनसाहित्य उपलब्ध होते का याचा अभ्यास करणे , या उद्दिष्टाचा समावेश केला आहे.त्यानुसार संशोधकाने शिक्षकांना खालील प्रश्न विचारले.

३.१ ग्रंथालयातून आपणास हवे असलेले वाचनसाहित्य मिळते का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क.१५**

हवे असलेले वाचनसाहित्य मिळते का

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी% |
|---|---|---|---|
| १ | होय | ४८ | ४४ |
| २ | नाही | ६२ | ५६ |
| | एकुण | ११० | १००% |


वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी ४४% शिक्षकांनी ग्रंथालयातून आपणास हवे असलेले वाचनसाहित्य मिळते असे सांगितले आहे तर ५६% शिक्षकांनी ग्रंथालयातून आपणास हवे असलेले वाचनसाहित्य मिळत नाही असे सांगितले.

यावरून असे लक्षात येते की हवे असलेले वाचनसाहित्य मिळत नाही असे म्हणणाऱ्या शिक्षकांची एकुण शिक्षकांपैकी टक्केवारी जास्त आहे.

३.२ ग्रंथालयातून आवश्यक तो ग्रंथ उपलब्ध न झाल्यास काय करता असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

आकृती क.१२

ग्रंथ उपलब्ध न झाल्यास काय करता




वरील स्तंभालेखाचे विश्लेषण करता असे लक्षात येते की ११० शिक्षकांपैकी ४०% शिक्षकांनी विकत आणतो असे सांगितले तर ६०% शिक्षकांनी सहशिक्षकांकडून किंवा विषयाशी संबंधित व्यक्तिंकडून मिळवित असल्याचे सांगितले आहे.

३.३ संशोधकाने शिक्षकांना ग्रंथालयातून पाठयपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळतात का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क.१६**

पाठयपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळतात का

| अ.नं. | **पर्याय** | **प्रतिसाद** | **टक्केवारी %** |
|---|---|---|---|
| १ | होय | ३९ | ३५% |
| २ | नाही | ७१ | ६५% |
| | **एकुण** | ११0 | १00 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११0 शिक्षकांपैकी फक्त ३५% शिक्षकांनी ग्रंथालयातून पाठयपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळतात असे सांगितले आहे तर ६५% शिक्षकांनी ग्रंथालयातून पाठयपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळत नाही असे सांगितले.

यावरून असे लक्षात येते की माध्यमिक शाळेतील शिक्षकांना पाठयपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळणे आवश्यक आहे.

३.४ संशोधकाने शिक्षकांना ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र.१७**

ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात का

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ८२ | ७५% |
| २ | नाही | २८ | २५% |
| | **एकुण** | ११0 | १00 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११0 शिक्षकांपैकी ७५% शिक्षकांनी ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात असे सांगितले आहे तर २५% शिक्षकांनी ग्रंथालयातून वर्त मानपत्रे मिळत नाही असे सांगितले.यावरून असे लक्षात येते की जास्तीत जास्त शिक्षकांना ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात.

३.५ ग्रंथालयातून नियतकालिके मिळतात का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.


**तक्ता क्र.१८**

नियतकालिके मिळतात का

| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ३४% |
| २ | नाही | ७३ | ६६% |
| | **एकुण** | ११0 | १00 |

आकृती क्र.१३

नियतकालिके मिळतात का




वरील आकृतीच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की ११० शिक्षकांपैकी फक्त ३४% शिक्षकांनी ग्रंथालयातून नियतकालिके मिळतात असे सांगितले तर ६६% शिक्षकांनी नियतकालिके मिळत नसल्याचे सांगितले आहे.जास्तीत जास्त शिक्षकांना नियतकालिके मिळत नाहीत. म्हणजेच, शाळांच्या ग्रंथालयामध्ये नियतकालिके खरेदी करणे आवश्यक आहे.

३.६ ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाबाबत आपण समाधानी आहात का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

### तक्ता क्र.१९

ग्रंथसंग्रहाबाबत आपण समाधानी आहात का


| अ.नं | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | होय | ३६ | ३३% |
| २ | नाही | ७४ | ६७% |
| | एकुण | ११० | १०० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की एकुण ११० शिक्षकांपैकी फक्त ३३% शिक्षकांनी ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाबाबत समाधानी असल्याचे सांगितले आहे तर ७४% शिक्षकांनी ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाबाबत समाधानी नाही असे सांगितले. यावरून असे लक्षात येते की जास्तीत जास्त शिक्षकांना ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह पुरेसा वाटत नाही.

३.७ मागील काही वर्षापेक्षा ग्रंथालयाचा दर्जा सुधारला आहे असे वाटते का असा प्रश्न विचारला असता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे माहिती मिळाली.

### आकृती क्र.१४

मागील काही वर्षापेक्षा ग्रंथालयाचा दर्जा सुधारला आहे का



वरील आकृतीच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की एकुण शिक्षकांच्या ३१% ग्रंथालयाचा दर्जा सुधारला आहे असे वाटते तर ६९% शिक्षकांनी ग्रंथालयाचा दर्जा सुधारला नाही असे सांगितले आहे. म्हणजेच जास्तीत जास्त ग्रंथालयाची आणखी सुधारणा करणे गरजेचे आहे.

३.८ सुधारला असल्यास कोणत्या बाबी आपल्या निदर्शनास आल्या असा प्रश्न विचारला असता शिक्षकांकडून खालीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

मागील काही वर्षांपासून ग्रंथालयाचा दर्जा सुधारला आहे असे सांगताना ३१% शिक्षकांनी खालीलप्रमाणे आपली मते नोंदविली आहेत.

१. ग्रंथालयाची जागा वाढली आहे

२. वाचनसाहित्याची संख्या वाढली आहे

३. ग्रंथेत्तर वाचनसाहित्य उपलब्ध होऊ लागल्याचे सांगितले आहे.

४. ग्रंथालयामधून इंटरनेट सुविधा मिळू लागल्याचे सांगितले आहे. तर काही शिक्षकांनी माध्यमिक शाळांमध्ये ग्रंथालयाच्या उपलब्धतेबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# प्रकरण ५

# निष्कर्ष आणि शिफारशी

संशोधकाने "पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकाडून होणारा ग्रंथालयांचा वापर : एक अभ्यास " हया विषयावर संशोधन केले आहे. संपूर्ण संशोधन प्रकल्पाचा अभ्यास केल्यानंतर पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील ग्रंथालयाची तसेच ग्रंथालयाचा शिक्षकांकडून होणा ऱ्या वापराबद्दल माहिती मिळते. त्यामध्ये संशोधकाने शाळांच्या ग्रंथालयांना तसेच शिक्षकांना प्रत्यक्ष भेटी देऊन आणि प्रश्नावली भरून घेऊन संशोधन पूर्ण केले. यावरून ग्रंथपाल प्रश्नावलीच्या विश्लेषणावरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

१ **ग्रंथपाल प्रश्नावली**

**१.१ ग्रंथपाल प्रश्नावली निष्कर्ष:**

१. पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व ग्रंथालयासाठी ग्रंथपाल आहे.

२. ग्रंथालयासाठी पुरेसा सेवकवर्ग उपलब्ध नाही.

३. प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र ग्रंथालय तास ठेवला जातो.

४. परिक्षेच्या काळात ग्रंथालयाच्या वेळेत वाढ करण्यात येत नाही.

५. वाचकांसाठी वाचनकक्षाची सोय आहे.

६. वाचनकक्षात साधारण ५0 विद्यार्थी बसण्याची सोय आहे.

७. पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ग्रंथालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय नाही.

८. पंढरपूर शहरातील एकुण ११ शाळांपैकी ६ माध्यमिक शाळांतील ग्रंथालयासाठी ग्रंथालय समिती आहे.

९. ग्रंथालय समितीमध्ये मुख्याध्यापक, ग्रंथपाल, शिक्षक प्रतिनिधी आणि विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश आहे.

१0. पंढरपूर शहरातील ९ माध्यमिक शाळांतील ग्रंथालयाचे वार्षिक अंदाजपत्रक साधारण १५हजार रू. इतकेच आहे.

११. ग्रंथालयात शिक्षक व विद्यार्थी यांच्या शिफारशींचा विचार करून ग्रंथ खरेदी केली जाते.

१२. पंढरपूर शहरातील ८ माध्यमिक शाळांतील ग्रंथालयामध्ये स्थानिक ग्रंथ विकेत्यांकडून ग्रंथ खरेदी केले जातात तर ३ शाळांच्या ग्रंथालयामध्ये प्रकाशकांकडून ग्रंथखरेदी केली जाते.

१३. पंढरपूर शहरातील ८ माध्यमिक शाळांतील ग्रंथालयातून शिक्षकांना २ पुस्तके घरी वाचनासाठी दिली जातात. तर ३ शाळांच्या ग्रंथालयातून शिक्षकांना ३ पुस्तके दिली जातात.

१४. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सर्व माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयाद्वारे निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा विविध नेत्यांच्या जयंती/पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात.

१५ . पंढरपूर शहरातील सर्व माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांमध्ये तक्ते, नकाशे इत्यादी मुद्रित तसेच  ग्लोब, सी . डी . रॉम, चित्रे /छायाचित्रे इ . अमुद्रित ग्रंथेतर साहित्य उपलबध आहे .

१६ . पंढरपूर शहरातील सर्व माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांमध्ये साधारण ५ ते १0 नियतकालिकांची खरेदी केली जाते .

१७ . एकावेळी शिक्षकांना साधारणपणे १ नियतकालिक घरी वाचनासाठी दिले जाते .

१८ . पंढरपूर शहरातील सर्व माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रे खरेदी केली जातात .

१९ . पंढरपूर शहरातील सर्व माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयामध्ये मराठी भाषेतील वर्तमानपत्रे खरेदी केली जातात .

२0 . पंढरपूर शहरातील  माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयामध्ये संगणक उपलब्ध नाही .

### १ . २ ग्रंथपाल प्रश्नावली शिफारशी :-

१ . शाळेच्या व्यवस्थापनाने ग्रंथालयासाठी पुरेसा सेवकवर्गाची सोय करावी .

२ . परिक्षेच्या काळात ग्रंथालयाच्या वेळेत वाढ करण्यात यावी .

३ . शिक्षकांना शाळा सुटल्यानंतर ग्रंथालय चालू असावे असे वाटते . त्यामुळे ग्रंथालयाची दैनंदिन वेळ वाढवावी .

४ . शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय करावी .

५ . शाळांतील ग्रंथालयासाठीचे वार्षिक अंदाजपत्रक वाढविण्यात यावे .

६ . शिक्षकांना ग्रंथालयातून संदर्भपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळण्यासाठी संदर्भग्रंथाची संख्या वाढवावी .

७ . शिक्षकांसाठी त्यांच्या आवडीनुसार अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध करण्यात यावा .

७ .माध्यमिक शाळेतील शिक्षकांना ग्रंथालयातून इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दयावी .

८ .शाळांच्या ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन कामासाठी संगणक उपलब्ध होईल हे पहावे .

## २ शिक्षक प्रश्नावली

### २ .१ शिक्षक प्रश्नावली निष्कर्ष:

१ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील जास्तीत जास्त शिक्षक दोन – तीन दिवसांतून ग्रंथालयात जातात .तर रोज ग्रंथालयामध्ये जाणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण त्यामानाने कमी आहे .

२ .पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षकांची ग्रंथालयात जाण्याची कोणतीही ठराविक वेळ ठरलेली नाही परंतु साधारणपणे जास्तीत जास्त शिक्षक रिकाम्या तासाच्यावेळी ग्रंथालयात जात असल्याचे दिसते .

३ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक विविध कारणांनी ग्रंथालयास भेट देत असतात .त्यामध्ये , संदर्भ पुस्तके चाळण्यासाठी, वर्तमानपत्रे /साप्ताहिके वाचण्यासाठी, आपल्या अध्यापन विषयाची सखोल माहीती मिळविण्यासाठी या कारणांचा समावेश होतो . तर जास्तीत जास्त शिक्षक , आपल्या अध्यापन विषयाची सखोल माहीती मिळविण्यासाठी ग्रंथालयात जातात असे दिसते .

४ . जास्तीत  शिक्षक आवश्यक ती माहिती मिळण्यास अडचण निर्माण झाल्यास ग्रंथपालास /सहाय्यक ग्रंथपालास विचारत असल्याचे दिसून येते .

५ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक  वाचनासाठी पुस्तकांची निवड पुस्तकाचे प्रास्ताविक वाचून करतात .

६ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षकांना  प्रभावी अध्यापनासाठी ग्रंथालयाचा वापर  अनिवार्य वाटतो .

७ .पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक  ग्रंथ खरेदीसाठी ग्रंथपालास शिफारस करतात .

८ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक  क्रमिक पुस्तकांसाठी तसेच संदर्भ पुस्तकांसाठी शिफारस करतात .

९ .  माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक  विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी रिकाम्या तासाच्यावेळी विद्यार्थ्यांना ग्रंथालयात घेऊन जातात तसेच विविध शैक्षणिक उपक्रम राबवितात .

१0 . माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक  विज्ञान- तंत्रज्ञान व प्रचलित माहिती देणारे वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रंथपालास शिफारस करतात .

११ . माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक शाळेच्या ग्रंथालयाद्वारे  होणा-या कार्यक्रमात सहभागी होतात .

१२ . माध्यमिक शाळांतील शिक्षकांना शाळा सुटल्यानंतर ग्रंथालय चालू असावे असे वाटते .

१३ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ६४% शिक्षकांना स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध नाही असे दिसते .

१४ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ५६% शिक्षकांना अभ्यासासाठी पुरक वातावरण उपलब्ध होत नाही .

१५ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ६५% शिक्षकांना शाळेच्या ग्रंथालयातून ग्रंथेत्तर साहित्य मिळत नाही .

१६ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ७५% शिक्षकांना ग्रंथालयातून इंटरनेट सुविधा मिळत नाही .

१६ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ५७% शिक्षकांना ग्रंथपालांकडून आवश्यक ती मदत वेळेत मिळत नाही .

१७ . शिक्षकांना ग्रंथालयातून मिळणाऱ्या इतर सेवासुविधांपैकी इंटरनेट सुविधा तसेच झेरॉक्स सुविधा मिळाव्यात असे वाटते .

१८ . ५६% शिक्षकांना हवे असलेले वाचनसाहित्य मिळत नाही .

१९ . शिक्षक त्यांना हवे असलेले वाचनसाहित्य न मिळाल्यास सहशिक्षकांकडून किंवा विषयाशी संबंधित व्यक्तिंकडून मिळवितात किंवा विकत आणतात .

२० . शिक्षकांना ग्रंथालयातून संदर्भपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळत नाही .

२१ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांना ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात .

२२ . ६६% शिक्षकांना ग्रंथालयातून आवश्यक ती नियतकालिके मिळत नाहीत .

२३ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ६७% शिक्षक ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाबाबत समाधानी नाहीत असे दिसते .

२४ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील ६९% शिक्षकांना मागील काही वर्षांपासून ग्रंथालयाचा दर्जा सुधारला नसल्याचे दिसते .

## २ . २ शिक्षक प्रश्नावली शिफारशी :

१ . पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी दररोज ग्रंथालयात जावे .

२ . शिक्षकांनी नवीन विषयांवरील माहिती मिळविण्यासाठी वर्तमानपत्रे व नियतकालिकांचे वाचन करावे .

३ . शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी प्रोत्साहित करावे .

### ३ पुढील संशोधनासाठी दिशा

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने ग्रंथालयाचा शिक्षकांकडून होणारा वापर यावर संशोधन केले आहे. माध्यमिक शाळेत मुख्याध्यापकही महत्त्वाची भुमिका बजावत असतात. त्यानुसार

१. मुख्याध्यापकांची ग्रंथालयाबाबतची भुमिका या विषयावर संशोधन केल्यास नवीन माहिती प्रकाशात येऊ शकते.

२. माध्यमिक शाळांच्या ग्रंथालयाच्या आर्थिक पुरवठयाच्या बाबी याचा अभ्यास करता येईल.

३. माध्यमिक शाळांच्या एकुण अंदाजपत्रकात ग्रंथालयास असलेले महत्त्व या विषयावर संशोधन करता यईल.

# मराठी संदर्भसूची


१. आगलावे, प्रदिप. (२000). *संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.* नागपूर: विद्या प्रकाशन. पृ. १७.

२. क-हाडे, बी.एस. (२0११). *शास्त्रीय संशोधन पध्दती.* नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स. पृ. १२.

३. कुंभोजकर,ग.वि. (२00२). *संशोधन पध्दती व संख्याशास्त्र.* कोल्हापूर: फडके प्रकाशन. पृ.क्र.१९

४. कुंभार, राजेंद्र. (२00४). *ग्रंथालय: निधी आणि अंदाजपत्रक.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन.पृ.२0.

५. कुंभार, राजेंद्र. (२00९). *वाचनसाहित्य संग्रहाचा विकास.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १४.

६. गणपुले,श.रा. (२000). *ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन.पृ.क्र. २४-२५

७. देशपांडे, ए. व्ही. (२00९). *ग्रंथालयांचा विकास आणि त्यांचे समाजातील कार्य.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.७.

८. देशपांडे, ए. व्ही. (२00९). *ग्रंथालयाचे विविध प्रकार व त्यांची कार्ये.* नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ३९,६३.

९. निकोसे, सत्त्यप्रकाश. (२00७). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्वती.* नागपुर: प्रज्ञा प्रकाशन. पृ.क.३८—३९.

१०. रिसवाडकर, म. रा. (२००९). *संशोधन व्याख्या आणि पध्दती*. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १ - ३.

११. रिसवाडकर, म. रा. (२००९). *माहिती संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण*. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ५.

१२. सावे, वसंत. (२००९). *शालेय ग्रंथालये*. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९,४.

१३. सातारकर, सु.प्र. (१९९५). *ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र*. औरंगाबाद पृ.क्र.१०८-११३.

१४. सुतार,धनंजय. (२०११) *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र*.वाराणसी: ए.बी.एस.पब्लिकेशन. पृ.क २०८.

१५. उबाळे, पदमजा. (२०१५). सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसयटी अतंर्गत येणाय्रा पुणे विभागातील व्यवस्थापकीय(एम.बी.ए.) महाविदयालयांतील ग्रंथालयांच्या अर्थ संकल्पाचा अभ्यास. (एम.फील.संशोधन प्रवंध) टिळक महराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

१६. चव्हाण, नि.ज.२०१२ ग्रंथालयशास्त्राच्या ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आशय विश्लेषणाचा अभ्यास.(एम.फील.संशोधन प्रवंध) टिळक महराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

१७. तादगे, संदीपान.द. (२००९). पुणे शहरातील पुणे विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय गंथालयाचे व्यवस्थापन आणि सेवांचा अभ्यास. (एम.फील.संशोधन प्रवंध) टिळक महराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# इंग्रजी संदर्भसूची


**1.** Agbo, A. D. (2015).School libraries and development of library skills in Nigerian Secondary education system. *International Science congress Association –Research Journal on Library science,* 3(2).

**2.** Andrade and Vergueiro (1996).Collection Development in Academic Libraries: A Brazilian Library's Experience. *New library world*, 97(4), 15-17.

**3.** C.L. Kaul and J.K.Gupta. (1990) A Sample Study of School Library Facilities and their Utilisation in Secondary and Higher Secondary School of four selected States: Independent Study. *(Ph.D.Thesis)* National Council of Education Research and Training, New Delhi.

**4.** Dike, V. W. (2000*).* School Library facilities required for successful implementation of the Universal Basic education in Nigeria. *Library philosophy & practice*,4(2),7-9.

**5.** Good &Halt: (2008). *Methods in Social Research*, New Delhi :Mc Graw Hill International book Company.

**6.** Gopal, M. H. (1970). *An Introduction to Research Procedure in Social Science*,Bombay: Asia Pub.House.

**7.** Gupta, Ranjana. (2013). Information needs and seeking behaviour of the teachers of Allahabad University: a study *(Ph.D.* Thesis). Bundelkhand University, Jhansi.

**8.** Jain, Sudarshan Kumar (2001) Library and information services in senior secondary schools: problems and prospects based on the study of senior secondary schools in Delhi.(*Ph.D.*Thesis). Bundelkhand University, Jhansi.

**9.** Kaula, P.N. "Education and school libraries: Observations on national education policy and school education". Herald of Library Science. V 28(4), Oct.1989. pp. 366-367.

**10.** Kothari, C. R.(2008) .*Research Methodology : Methods & Techniques*, New Delhi: New Age International Limited .

**11.** Krishan Kumar. "Standards for school library proposal". In: School library development. Seminar papers presented at the All India Library Conference. New Delhi: ILA, 1986.

**12.** Krishana, Kumar: (2008). *Library Administration & Management*, New Delhi : Vikas Publication House Pvt.Ltd.

**13.** Mahajan, Preeti. (2009*)*. School Libraries in India: Present day Scenario Punjab University, Chandigrah, India. *Library Philosophy and Practice (e-journal)* 371.

**14.** Nwachukwu, V. N. (2005). Utilizing the school library facilities for enriching curriculum and instruction for diverse learners at the primary level education. *Global journal for research anayalisis,*3(3), 77-81.

**15.** Omera, Johnson. (June-2013). Teacher's utilization of Secondary School libraries in Idah Local Government Area, kogi state University, Anyigba*. African educational reasearch journal*,1(2), 96-101.

**16.** Sadhu, A. N.(1993). *Research Methodology in Social Science*, Bombay Himalaya Publication.

**17.** Selvakumar P.(2011 ) The status of high school and higher secondary school libraries in karur district: a study. *(Ph.D. Thesis)* Tamilnadu, India.

**18.** T. Mohapatra.(1991) Problem of Secondary School Teachers: A Comparative Study of Government and Private School Teacher. (*Ph.D. Thesis)* Utkal University, Cuttack.

पंढरपूर शहराचा नकाशा



“पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर : एक अभ्यास”

## ग्रंथपाल प्रश्नावली

योग्य जागी √ अशी खुण करा.

१. शाळेची सर्वसाधारण माहिती :

१.१ शाळेचे नाव : ----------------------------------------------------

१.२ स्थापना वर्ष:

१.३ पत्ता : ---------------------------------------------------------

१.४ फोन नंबर :

२. शिक्षक आणि विद्यार्थी संख्या :

शाळेची प्रवेश क्षमता व प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या किती आहे.

| अ.न. | अभ्यासक्रम वर्ग | प्रवेश क्षमता | प्रत्यक्ष प्रवेश |
|---|---|---|---|
| १ | ८ वी | | |
| २ | ९ वी | | |
| ३ | १0 वी | | |

३. ग्रंथालय सेवकवर्ग :

३.१ ग्रंथालयामध्ये सेवकवर्ग किती आहे.

| अ.न. | सेवक वर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | |
| २ | सहायक ग्रंथपाल | |
| ३ | ग्रंथालय लिपिक | |
| ४ | शिपाई | |

३.२ ग्रंथालय सेवकवर्ग ग्रंथालय कामासाठी पुरेसा आहे का?

१.होय ☐ २.नाही ☐

**४. ग्रंथालयाची वेळ :**

४.१ ग्रंथालय वापरासाठी प्रत्येक वर्गाला स्वतंत्र वेळापत्रक आहे का?

होय ☐ नाही ☐

४.२ परीक्षेच्या काळात ग्रंथालयाच्या वेळेत वाढ करण्यात येते का ?

होय ☐ नाही ☐

**५. वाचन कक्ष :**

५.१ वाचकांसाठी स्वतंत्र अभ्यासिका कक्ष आहे काय ?

१.होय ☐ २.नाही ☐

५.२ वाचनकक्षात एकावेळी किती विद्यार्थी अभ्यासास बसू शकतात?

१. ५० ते १०० ☐ २. १०० ते २०० ☐

३. २०० ते ३०० ☐ ४. पेक्षा जास्त ☐

५.३ शिक्षकांसाठी स्वतंत्र अभ्यासिका आहे का?

१.होय ☐ २.नाही ☐

**६. ग्रंथालय समिती :**

६.१ ग्रंथालयासाठी ग्रंथालय समिती आहे काय?

१.होय ☐ २.नाही ☐

६.२ ग्रंथालय समितीमध्ये प्रतिनिधींची संख्या किती आहे.

१. पाच ☐ २. सात ☐

३. दहा ☐ ४. पेक्षा जास्त ☐

६.३ ग्रंथालय समितीत पुढील कोणाचा समावेश आहे.

१. मुख्याध्यापक ☐ २. ग्रंथपाल ☐
३. शिक्षक प्रतिनिधी ☐ ४. विद्यार्थी प्रतिनिधी ☐

७. **अंदाजपत्रक :**

७.१ ग्रंथालयाचे वार्षिक अंदाजपत्र किती आहे.

१. १५ हजारापर्यंत ☐ २. २५ हजारापर्यंत ☐
३. ५0 हजारापर्यंत ☐ ४. पेक्षा जास्त ☐

७.२ मागील तीन वर्षाच्या ग्रंथालय करीत असलेल्या खर्चाचा तपशिल

| अ.न. | वर्ष | आर्थिक तरतुद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | २0११-२0१२ | | |
| २ | २0१२-२0१३ | | |
| ३ | २0१३-२0१४ | | |
| | एकुण खर्च | | |

८. **ग्रंथनिवड आणि ग्रंथखरेदी :**

८.१ ग्रंथालयामध्ये ग्रंथनिवड कोणत्या प्रकारे केली जाते?

१. ग्रंथ परिक्षणे ☐ २. प्रकाशकांच्या याद्या ☐
३. स्थानिक ग्रंथविक्रेते याद्या ☐ ४. शिक्षक व विद्यार्थी शिफारशी ☐

८.२ ग्रंथालयामध्ये ग्रंथखरेदी कोणाकडून करता?

१. प्रकाशक ☐ २. लेखक ☐
३. स्थानिक ग्रंथ विक्रेते ☐ ३. इतर ☐

८.३ ग्रंथालयातील एकुण ग्रंथ संख्या किती आहे.

| अ.न. | ग्रंथप्रकार | संख्या |
| --- | --- | --- |
| १ | पाठयपुस्तके | |
| २ | संदर्भ ग्रंथ | |
| ३ | अवांतर वाचनसाहित्य | |
| | एकुण | |

८.४ शिक्षकांना एकावेळी किती ग्रंथ दिले जातात.

१. दोन ☐ २. तीन ☐

३.पाच ☐ ४. पेक्षा जास्त ☐

**९. ग्रंथालय उपक्रम :**

९.१ विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून खालील कोणते उपक्रम राबविले जातात.

| अ.न. | उपक्रम | होय | नाही |
| --- | --- | --- | --- |
| १ | निबंध स्पर्धा | | |
| २ | वक्तृत्व स्पर्धा | | |
| ३ | चर्चा सत्र | | |
| ४ | ग्रंथ प्रदर्शन | | |
| ५ | विविध नेत्यांच्या जयंती/पुण्यतिथी | | |

**१०. ग्रंथेत्तर साहित्य :**

१०.१ ग्रंथालयात ग्रंथेत्तर साहित्य आहे काय?

होय ☐ नाही ☐

१०.२ आपल्या ग्रंथालयात खालील पैकी कोणते **मुद्रित ग्रंथेत्तर** साहित्य आहे.

| अ.न. | मुद्रित ग्रंथेत्तर साहित्य | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | तक्ते | | |
| २ | नकाशे | | |
| ३ | हस्त पुस्तिका | | |

१०.३ आपल्या ग्रंथालयात खालील पैकी कोणते **अमुद्रित ग्रंथेत्तर** साहित्य आहे.

| अ.न. | अमुद्रित ग्रंथेत्तर साहित्य | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | ग्लोब | | |
| २ | सी.डी.रॉम | | |
| ३ | चित्रे व छायाचित्रे | | |
| ४ | प्रतीकृती | | |

**११. नियतकालिके :**

११.१ ग्रंथालयात नियतकालिके खरेदी केली जातात काय?

होय ☐ नाही ☐

११.२ होय असल्यास ग्रंथालयात येणा-या नियतकालिकांची संख्या किती?

१.पाच ते दहा ☐ २. दहा ते वीस ☐

३. वीस ते तीस ☐ ४. पेक्षा जास्त ☐

११.३ कोणत्या प्रकारच्या नियतकालिकांची खरेदी केली जाते.

१. विषयाशी संबधित ☐ २. सर्वसाधारण नियतकालिके ☐

११.४ नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी दिली जातात का?

१.होय ☐ २.नाही ☐

११.५ एकावेळी किती नियतकालिके शिक्षकांना घरी वाचनासाठी दिली जातात.

१. एक ☐ २. दोन ☐

३. तीन ☐ ४. पेक्षा जास्त ☐

१२. वृत्तपत्रे :

१२.१ ग्रंथालयात वृत्तपत्रे खरेदी केली जातात का?

होय ☐ नाही ☐

१२.२ होय असल्यास ग्रंथालयात येणा-या वृत्तपत्रांची संख्या किती.

१. दोन ☐ २. पाच ☐

३. सात ☐ ४. पेक्षा जास्त ☐

१२.३ ग्रंथालयात कोणकोणत्या भाषेतील वृत्तपत्रे येतात.

१. मराठी ☐ २. हिंदी ☐

३. इंग्रजी ☐

१३. ग्रंथालयात संगणक वापर :

१३.१ ग्रंथालयात संगणक आहे का?

१.होय ☐ २.नाही ☐

१३.२ होय, असल्यास संगणकाचा वापर कोणत्या कामासाठी केला जातो.

१. ग्रंथ दाखलनोंद करण्यासाठी ☐ २. ग्रंथ देवघेव करण्यासाठी ☐

३. ग्रंथ परिगणन ☐ ४. कार्यालयीन कामासाठी ☐

ठिकाण :

दिनांक : ग्रंथपाल सही/ शिक्का

## “पंढरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांकडून होणारा ग्रंथालयाचा वापर : एक अभ्यास”

### शिक्षकांसाठी प्रश्नावली

योग्य जागी √ अशी खुण करा.

शाळेचे नाव : ____________________

शिक्षकाचे नाव : ____________________

अध्यापनाचा विषय : ____________________

**१. शिक्षकांकडून ग्रंथालयाच्या होणा-या वापराबाबत...**

१.१ ग्रंथालयात किती दिवसातून जाता ?

१. दररोज ☐ २. दोन ते तीन दिवसातून एकदा ☐

३. आठवडयातून एकदा ☐ ४. महिन्यातून एकदा ☐

१.२ ग्रंथालयात कोणत्या वेळी जाता ?

१. शाळा भरण्यापूर्वी ☐ २. रिकाम्या तासाच्यावेळी ☐

३. मधल्या सुट्टीत ☐ ४. शाळा सुटल्यानंतर ☐

१.३ ग्रंथालयास भेट देण्याचा आपला प्रमुख हेतू कोणता असतो ?

१. आपल्या अध्यापन विषयाची सखोल माहिती मिळविण्यासाठी ☐

२. संदर्भ पुस्तके चाळण्यासाठी ☐

३. वर्तमानपत्रे साप्ताहिके वाचण्यासाठी ☐

४. एखादा लेख शोधण्यासाठी ☐

१.४ आपणास आवश्यक ती माहिती मिळविण्यास अडचण निर्माण झाल्यास काय करता ?

१. ग्रंथपाल किंवा सहाय्यक ग्रंथपालास विचारता ☐

२. कपाटातील सर्व पुस्तके चाळता ☐

३ . इतर पर्याय अवलंबिता ☐

१ .५ वाचनासाठी पुस्तकांची निवड कशी करता ?

१ . ग्रंथपालास विचारून ☐ २ . ग्रंथालय तालिका पाहून ☐

३ . पुस्तकाचे प्रास्ताविक वाचून ☐ ४ . इतरांकडून माहिती घेऊन ☐

१ .६ प्रभावी अध्यापनासाठी ग्रंथालयाचा वापर अनिवार्य वाटतो का ?

१ . होय ☐ २ . नाही ☐

१ .७ ग्रंथ खरेदीसाठी ग्रंथपालास शिफारस करता का ?

१ . होय ☐ २ . नाही ☐

१ .८ ग्रंथालयात कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदी करण्याकरिता शिफारस करता ?

१ . क्रमिक ग्रंथ ☐ २ . संदर्भ ग्रंथ ☐

३ . अवांतर वाचनसाहित्य ☐

१ .९ विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आपण कसे प्रोत्साहित करता ?

१ . रिकाम्या तासाच्यावेळी विद्यार्थ्यांना ग्रंथालयात घेऊन जाता ☐

२ . ग्रंथालयात असलेल्या विविध पुस्तकांचे वाचन करण्यास सांगता ☐

३ . विविध शैक्षणिक उपक्रम राबविता ☐

१ .१0 विज्ञान तंत्रज्ञान व प्रचलित माहिती देणारे वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रंथपालास शिफारस करता का ?

१ . होय ☐ २ . नाही ☐

१ .११ आपल्या शाळेच्या ग्रंथालयाव्दारे होणा-या कार्यक्रमात आपला सहभाग असतो का ?

१ . होय ☐ २ . नाही ☐

**२. ग्रंथालयाकडून शिक्षकांना मिळणा-या सोयी सुविधांबाबत...**

२.१ दैनंदिन वेळेशिवाय ग्रंथालय आणखी कधी कधी चालू असावे असे वाटते ?

१. रविवारी ☐ २. इतर सुट्टीच्या दिवशी ☐

३. शाळा सुटल्यानंतर ☐

२.२ ग्रंथालयामध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष उपलब्ध आहे का ?

१. होय ☐ २. नाही ☐

२.३ ग्रंथालयाचे वातावरण अभ्यासाच्या दृष्टीने पूरक आहे का ?

१. होय ☐ २. नाही ☐

२.४ ग्रंथालयातून ग्रंथेत्तर साहित्य मिळते का ?

१. होय ☐ २. नाही ☐

२.५ ग्रंथालयातून इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिली जाते का ?

१. होय ☐ २. नाही ☐

२.६ इंटरनेट सुविधेचा वापर आपण कशासाठी करता ?

१. प्रचलित घडामोडींची माहिती मिळविण्यासाठी ☐

२. अध्यापनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी ☐

२.७ ग्रंथपालांकडून आपणास आवश्यक ती मदत वेळेत मिळते का ?

१. होय ☐ २. नाही ☐

२.८ ग्रंथालयातून इतर कोणत्या सेवासुविधा मिळाव्यात असे आपणास वाटते ?

१. संदर्भसेवा ☐ २. वृत्तपत्र कात्रणसेवा ☐

३. झेराक्स सेवा ☐ ४. इंटरनेट सेवा ☐

**३.वाचनसाहित्य उपलब्धतेबाबत**

३.१ ग्रंथालयातून आपणास हवे असलेले वाचनसाहित्य मिळते का ?

१. होय ☐ २. नाही ☐

३.२ ग्रंथालयातून आवश्यक तो ग्रंथ उपलब्ध न झाल्यास काय करता ?

१. विकत आणता ☐

२. सहशिक्षकांकडून मिळविता ☐

३.३ ग्रंथालयातून पाठ्यपुस्तके पुरेशा प्रमाणात मिळतात का ?

१. होय ☐ २. नाही ☐

३.४ ग्रंथालयातून वर्तमानपत्रे मिळतात का ?

१. होय ☐ २. नाही ☐

३.५ ग्रंथालयातून नियतकालिके मिळतात का ?

१. होय ☐ २. नाही ☐

३.६ ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाबाबत आपण समाधानी आहात का ?

१. होय ☐ २. नाही ☐

३.७ मागील काही वर्षापेक्षा ग्रंथालयाचा दर्जा सुधारला आहे असे वाटते का ?

१. होय ☐ २. नाही ☐

३.८ सुधारला असल्यास कोणत्या बाबी आपल्या निदर्शनास आल्या ?

______________________________

______________________________

______________________________

शिक्षक सही